१२५ बकरी दोन्ही किल्या मिलोन दसरा दिवाली सिमगा व किरकोली पोलजत्रा व कुरणाची जत्रा वगैरे मिलोन चौकसीने सदरहूपो खर्च करावा.

४८ कुणबिणी दोन्ही किल्यास कस ६ येकूण सरसाल

३० लुगडी १२ दर २॥

१२ जोट ६ दर २ प्रो पहिले नसिले दिल्हे तरी येके वरसा आड

६ घोगडी ६ दर १ प्रो

४८

सदरहू किलाहून कुणबीण गेली आली त्याच अजमासे खर्च करावा येणेप्रो

७५ गस्तीस काबले दोन्ही किले व माची मिलोन दर साल काबली सुमार ५० दर १॥ प्रो सदरहूपो चौकसीने खर्च करावा येणेप्रो

५४८

८६२६६।

+ बहा=खर्च.

यासी यैवज़ अजमासे रुो

१२००० गवगना पौ गाव देहे ३२ येकूण रुा ३७००० पौ गाव बेचिराख देहे १६ येकुण रुा १४००० बाकी रुा २३००० पौ खरीफ अगदी नाही, रबी पेरली आहे त्याचा अजमास

५००० पेस्तर सालची तुसार पटी[१] गावपौ

७८५० सिलक होन नाणे ४६०० यौ अजमासे रुा १६५००

पौ वजा खर्च रुा

६४०० आरब व पुर्बे नामजाद लोकास ताा रामचद्र त्रिंबक

२२५० स्वारीखर्च

८६५०

२४८५० बाकी

बाकी देणे रुा

६१४१६।•

येणेप्रमाणे खर्चाची नेमणूक शाहासी हजार दोनसे सवासासष्ट रुा. यासी यैवज चौवीस हजार आठशे पनास रुो, बाकी देणे येकसष्ट हजार च्यारसे सवासोळा रुा येकुण सदरहूप्रमाणे नेमणूक करार करून दिल्ही असे. हाजिरी गैरहाजिरी मनास आणून चौकसीने खर्च करणे. याखेरीज बहेड्यासमधे कलमे बीतपसील

यैनजिनस गला वजन देवस्थानास व धर्मादाव व कुणबिणी व दिवाबती वगैरे सालबादप्रो खर्चाची नेमणूक दरमाहा यैनजिनस

देवस्थाने किले पुरधर	अज गला कैली	वजनी वजन पके
श्रीकेदारलिंग येक माही	८॥२॥।	८८४॥।
[तपसील]		
श्रीरामेस्वर येक माही	८।१।=	८८१
[तपसील]		
श्री नारायेण बनातील येकमाही बेगमी	८॥२॥।	८८४॥।

• १ तुसारपट्टी=The land-tax of which payment was required from the cultivators immediately on the appearance of the grain in the ear.

7691

[तपसील]

श्री पुरदरेस्वर येकमाही	८।१।=	८८४॥।
[तपसील]		
श्रीनारायेणगडचा	८।१।=	८८१
श्रीबहिरव	८।१।=	८८=।॰
श्रीहनुमत माचीचा	८।१।=	८८१
श्रीम्हकालेस्वर येक माही	८।१।=	८८१॥।
श्रीअश्वथ येक माही	८।१।=	८८॥॰
श्रीकातूरजाई	८।१।=	८८१
श्रीहनुमतगडचा	८।१।=	८८१
श्रीयेकवीरा	८।१।=	८८१
श्रीमुकाईस बोटवातीस येकमाही तेल	८०	८८॥॰

(टीप.—प्रत्येकाचा तपसील गाळला आहे तसाच पुढील बारमाही हिशेबहि गाळला आहे.)

रोशनाईबदल तेल वजनी ८।॥६।९

वजन पके

८८६॥९ दरवाज्यास

८८१॥।९ सरदरवाजा

८८१॥।९ बिनीदरवाजा

८८१॥।९ केदारदरवाजा

८८१ दरवाजा माची

८८६॥९

८८६॥ आलगेस

८८॥॰ वाघोजी ना जाधव

८८॥ नवलोजी ना पेटकर

८८१ सोपा सदरेजवलील

८८॥ चाहूजी नो ढगरे

८८१ संताजी नाईक

८८॥ कानोजी नाईक

८८॥ बालोजी ना मिसाल

८८॥॰ तोफखाना

८८१ माहाराचे अलगेस

꠴꠴॥ गडचे सदरे पुढील
꠴꠴॥ माचीचे सदरे पुढील
꠴꠴॥ राणोजी ना। पेटकर

꠴꠴२ चौक्यास
꠴꠴१ वाडा नि॥ नीलकठ
माहादेव
꠴꠴१ चौकी बदीवान

꠴꠴२

꠴।१। मशालेस
꠴꠴३॥। कोडाजी ना। चिव्हे
꠴꠴३॥। डोगरोजी ना। यादव
꠴꠴३॥। बहीरजी काले सरनोबत

꠴꠴२ तासास
꠴꠴॥. जामदारखाना
꠴꠴७॥ सदरेस
꠴꠴३॥। पुरधर
꠴꠴३॥। माची सदरा २

꠴꠴७॥

꠴꠴॥।६।९

खैरात खर्च मसिदीस किले ꠴꠴१
पुरंधर तेल वजन पके
꠴꠴१
दफ्तरखर्च शाईसिरे बदल ꠴꠴॥। ꠴꠴४
दोन्ही किले मिलोन
गला बाजरी तेल वजन पके
꠴꠴॥। ꠴꠴४
तैवजखर्च दोन्ही किले मिलोन ७।
वजन पके पाने विड्याची
꠴꠴४ सुपारी * सुमार

ᠪᠪ३ ताबाखू ७९००
ᠪᠪ। कात

धर्मादाव ग्रामजोसी पच्याग श्रवण नित्य करितो त्यास [तपसील] किले पुरधरे किले वज्रगड	ᠪ१।ᠪ१॥	ᠪᠪ५
देवस्थाने श्रीरुद्रेस्वर व हनुमतास नदादीप व नैवद्य मिलोन [तपसील]	ᠪ१ᠪ१॥	ᠪᠪ
रोशनाई तेल वजन पके		ᠪ।८ᠪ९

ᠪᠪ२॥ सदरेस
ᠪᠪ१॥ दरवाजा
ᠪᠪ।॥९ जाधव पेटकर पाहारा
ᠪᠪ॥ घेऱ्याचे मेटास
ᠪᠪ॥ पाहारे
ᠪᠪ।॰ भिसे
ᠪᠪ।॰ कडका (?)
ᠪᠪ।॰ बारशाचा
ᠪᠪ॥ अलग नागिनीचे बुरज
ᠪᠪ४ दिवटी नाईकास
ᠪᠪ७॥ हवालदार सरनोबत
आा २

¶*This paper contains the budget for the forts of Purandar and its companion Vajragad. Forts played an important part in the Maratha administration, and the various items in the budget will be found worthy of study. This paper gives the total annual expenditure, the sources from which it was to be met, the strength of the garrison, its annual pay-bill and other matters of political and religious significance. The details of the two important forts Purandar and Sinhagad are here copied for the special study of that subject.*

7694

श्री

पौ छ १ सवाल
अधिक चैत्र मास
सन सीत

[Rd. 13-3-1766

अजमास किले पुरंधर व वज्रगड सुहूर सन सीत सितैन मया व अलफ इा छ १ राखर अश्विन मास ता छ ३० रमजान फाल्गुन अखेर सा माही अजमास रुो

३७७८७॥ नेहमी खर्च बाा बेहडा ८६२६६।. पैकी सा माही आकार रुो.

[तपसील मागील लेखांकबरहुकूम]

६४६० खेरीज बेहडा नेमणूक जाली आहे रुा

२२५० खासा स्वारीचे मुकाम राजवाडी येथें जाले त्यास खर्च बेहड्यास होनाचे ऐवजांत वजा दिल्हे आहेत ते रुो

१७१० हवालदार व सरनोबत दोनी किले मिलोन

४५० खुा तैनाता रुो

६०० किले पुरंधर

३०० हवालदार

३०० सरनोबत

५५० किले वज्रगड

३०० हवालदार

२५० सरनोबत

११५०

११५०

पैकी च्यार रोजमरे याचा आकार

१२६० निा लोक आा ४५

दर आसामीस रुा ७ प्रो दरमाहे

३१५ रोजमरे ४

१७१०

7695

२०० राजाराम गोविंद सबनीस किले पुरंधर मोईन
साल्हिना रुा ४०० पैकीं तूर्त

२३०० सुभेकरी कारकून याच्या मोइना साल्हिना रुा
३००० राजाराम त्रिंबक
३५० रामाजी नारायेण फडणीस
२५० दफ्तरदार
४०० तिमाजी गिरमाजी सिलेदार
६०० जिवाजी भिरवाजी सिलेदार

४६००

६४६० पैकी सामाही आकार रुा

११६०७ हुजूरचे नामजाद आरब व परदेसी याचे दर माहे रुा
५९०१ दिमत आरब दर माहे रुा
९५० साहिबखान आा ६०
५२५ खैरुलाबेग आा ३४

१४७५ ९४

पैकी त्रीस रोजा रुा ९८३॥
—इा छ १ राखव ताा छ ३० रमजान मुाा माहे
६ याा आकार

५७०६ परदेसी आसामी यो
३४० दिाा देवीसिंग ४४
६९७॥ दिाा दलपतसिंग ८०

१०३७

—सा माही कबज रुपये ६२२५ पैकी वजा आकर माही
रुा ५१९ बाकी

११६०७

५५८५४॥

यासी ऐवज———————————————————रुा

[तपसील]

7696

[5-10-1766

श्री

नेमणूक किले पुरंधर व वज्रगड निा नारो आपाजी सुा सबा सितैन मया व अलफ इा छ १ जमादिलोवल ता छ ६ मोहरम अखेर साल मुदत माहे ८८६ पौ वजा रोज ७ बाकी मुदत माहे ७८२९ येकूण खर्चाची नेमणूक

८२४३८॥≡॥. बा अजमास मखलासीचा इा छ १ जमादिलोवल सन मजकूर ता छ ३० रबिलाखर सन समान सितैन येकूण बारामाही नेमणूक करून दिल्ही आहे, त्यापैकी सन मजकूरचें मुदतींची हिसेरसीद अखेर सालपावेतो

२८८४०॥ बदल मुशाहिरा

२०४४॥· हवालदार व सरनोबत व कारकून आसामी येकूण मोईन सालिना रुा ३८०० पौ मुदतमाफक सनदात ज्या तेरखेपासून वेतन द्यावयाचा करार आहे त्याप्रमाणे रुा

१०६०। किले पुरंदर

२०॥। फिरंगोजी नरसाले सरनोबत रुा २९० पौ

३९६॥ आपाजी जनार्दन सबनीस सालिना ६०० पौ

१६४॥। बाबूराव विश्वनाथ फडनीस निा सबनिसी रुा २९० पौ

१३२ गोपाल बलाल फडनीस निा कारखानिसी रुा २०० पौ

7697

११९। जिवाजी विठल दफ्तरदार मोईन १७९ पो

९९ उमाजी अनंत दफ्तरदार मोईन रुा १९० पो

६६ धोंडो माणकेश्वर रुो १०० पैकी

६६ सदासिव बलाल वेतन रु १०० पैकी

१०६०।

६८७॥ किले वज्रगड

२९ जगजीवन माहाले हवालदार वेतन २९० पो

२२॥ मालजी निकम सरनोबत रुो २२९ पौ

१६४॥ माहिपतराव जिवाजी सबनीस रुा २९० पो

१४८॥। सदासिव माधवराव कारखानीस २२९ पो

९८। अंताजी मोरेश्वर ८३॥। सबनिसीचे वेतन १९०पैकी पुढे मारनिलेकडून दूर जाहाली

१४॥ कारखानि-
सीकडील
फडनिसी
बा। वेतन
१५० पो

९८।

८२॥ खंडो नारायेण
दफ्तरदार १२५
पो
८२॥ मैराळ नारायण
दफ्तरदार रुा
१२५ पो
४९॥ मोरो केशव
१० बापूजी आनंदराव
फडनीस दि।
सबनिसी वेतन
रुो १०० पो

६८७॥

२९६।॥ ठाणे माची
१३२। कासीबा थोरात
सरनोबत २००
पौ
१६४॥ लक्षुमण गणेश
कारकून २५०
पों

२९६।॥

२०४४॥

[कारणापुरता भाग उतरून घेतला आहे.]

श्री

तेरीज किले पुरंधर व वज्रगड येथील सरंजामाचे गांवचा आकार
सुा समान सितैन मयां व अलफ

किले पुरंधर

		तनखा	वजा मोकासी	बाकी तनखा	यासी आकार
तााका करेपठार					
मौजे	पिसे	३६१	०	३६१	३५८।"
मौजे	साकुरडे	९१५।।।"	१९५।।=	७२०॥=	९५१।"
मौजे	जळगाव	१७१६	३६६।।=	१३४९।=	२१८५।।"
मौजे	सोमुर्डी	३७१।"	७९।÷	२९१।।।≡	३५७
मौजे	राजेवाडी	८४५।।=	१८०।।≡	६६४।।।≡	१०९४।।
मौजे	उंडवडी	१७३७।।≡	३७१।=	१३६६।÷	२२९८।।
मौजे	पांडेश्वर	११७५।।=	३३०।÷ +	८७५।।=	९०४।।
मौजे	पूर	४६२	२२४।।	२३७।।	३०
मौजे	धालेवाडी	४५७।।।=	९७।।।÷	३६०॥÷	८१०
मौजे	नायेगाव	११६५।=	२४९	९१६।=	१३८०
मौजे	पोंढे	७३०॥=	१५६	५७४॥=	६१८
मौजे	अजनगांव	१४१९	२०३॥=	१२१५।।।=	१८८२
ताा बिरथडी					
		११३५७।÷	२५२४॥÷	८८३३।"	१२८२९।।।

मौजे हरगुडी
मौजे कालदरी
मौजे निंबून
मौजे दौडंज
मौजे किकवी
मौजे धनकवडी
— प्रांत पुणे
पाा सुपे

[नमुन्यापुरता भाग घेतला आहे.]

+ आंकडा संशयित.

मौजे मुंजवडी
मौजे मावडी
मौजे उंडवडी
कर्यात सासवड
मौजे बेलसर
मौजे दिये
मौजे देहुडी ताा खेडेबारे
मौजे वाठार पाा सिरवल

किले वज्रगड

ताा करेपठार
मौजे जोगवडी
मौजे जवलार्जून
मौजे कोढीत खुर्द
मौजे भिवडी
मौजे वनपुरी

ताा निरथडी
मौजे केंजल
मौजे म्हाडर
मौजे पांगारे
—प्रांत पुणे
मौजे उंबरे ताा खेडेबारे

	रुाा
आकार समान	३३८०८

श्री

अजमास किंले पुरंधर व वज्रगड निाा राजश्री नारो आपाजी सुाा समान सितैन मया व अलफ इाा अवलसाल ताा अखेर साल खर्च बेरीज रुपये

किले पुरंधर व वज्रगड व माची नेहमी खर्च रुा

६३१६९॥ लोक व कारकून याचा आकारदेखील अडीसेरी

४४२५ कारकून

२०७५ किले पुरंधर

१७२५ बा बेहेडा गुदस्ता [नावे व वेतन गुदस्ता प्रो आहेत ती सोडून]

३५० जाजती

१५० विठल बल्लाळ बा सनद

१५० हरि नारायण

५० गोविंद मोरेश्वर सभासद सालिना १५० प्रो मुदत माफिक

३५०	३
२०७५	१०

१६५० किले वज्रगड [नावे व वेतन गुा प्रो आहे ती सोडून]

१२५ जाजती सोमाजी केशव

७०० ठाणे माची

[नावे व वेतन गुा प्रा आहे ती सोडून]

१५० जाजती

१०० बच्याजी हरि पेठेचे दास्तानाकडे

५० लक्ष्मण गणेश इजाफा साल मार पान

१५०	१
७००	४

१४२८२॥ दिा॰ दीपाजीराव येरूणकर हवालदार

एन आसामी	किता
१ खासा	९ मोई
२३५ सरदार सिपाई व पोरगे	५ घोडे
१ भालदार	——
——	१४
२३७	

येकून आकार

२९५० खेरीज मुशारा

३५० वर्षासने

१५० रघुनाथभट गडबोले

३०० माचीचे ब्राह्मणास

——

३५०

श्री

तालीक

अजमास किले पुरंधर व वज्रगड निा नारो आपाजी सुा आर्बा सबैन मया व आलफ इा अवल सालच्या अखेरसाल खर्चाची नेमणूक रुा

[कारणापुरता उतारा.]

८४ तुळाजी आंगरे किले मजकुरी आहेत त्यास वहिवाटीस पावते परंतु नेमणूक नाही सबब

६० खर्ची दरमहा रुो ५ प्रमाणे बार माही आकार रुो ६०

२४ पोर्गा खटपटेस आहे त्यास दरमाहा रुो २ प्रमाणे बारमाहा आकार रुो २४

३५० वर्षासने [सबैन मया व अलफ]

२०० माचीचे ब्राह्मण

५० सदासिवभट पुरंधरे

०० बच्यंभट पुरंधर

३० नारो आनंत पुरधरे

३० जिवाजी केशव डिगणकर

३० आपाजी पिलदेव

३० बालाजी नारायेण

१५० रघुनाथभट गोडबोले

३५०

[इहिदे सबैन मया अलफचे अजमासांतून]

१४८ बालपरवेसी किले व घेरा येथे किले मजकूरचे लोक नामजाद होते त्यापैकी संन तिसा सितैनात किले खैराई प्रांत रामनगर येथील मसलतीस मयेत जाहाले त्यांस बालपर्वेसी वहिवाटीस खर्च पडिला आहे त्यास गुदस्ता बहेडा जाहला तें समई वहिवाट समजली नाही यामुळें नेमावयास राहिले ते आसामी ६ येकूण रुपये

१०० दसमाही सिरस्ता कबिलदार आसामी ३ येकूण तैनात दरमाहा रुपये १० प्रो

४८ आठमाही सडे आसामी ३ येकूण तैनात दरमाहा रुा ६ प्रमाणे कबज

१४८

११७५ मौजे चाडवे ताा बिरवाडी तालुके माहाड हा गाव मोकासा सन तिसापासून आहे [दीपाजीराव येरूणकरास] त्याचा आकार बाा मखलासीची याद छ ७ साबान सन मजकूर

आजमास किले पुरंधर व वज्रगड निाा नारो आपाजी सुाा इसने सबैन मया व अलफ

बदल मुशाहिरा बाा हाजरी अवल साल

	आा	यैन	पोर्गे	घोडे	भोई	तैनात	मोईन	रोज	*	*
यैन हशम	६५४	६०९	३५	१	९	३५३७॥	७००	...		
दरकदार	३१	१३	५	४	९	१२३९	१४४०	...		

7704

बाजे हशम	२९	२९	०	०	०	११७॥	०	११७॥
बाणदार	२	२	०	०	०	११॥	०	११॥
गोलंदाज	२	२	०	०	०	१९	०	१९
	७१४	६९१	४०	९	१८	४९२०॥	३८४०	४१०९।

[याच सालच्या दुसऱ्या कागदात]

जेजालदार	११	१०	१	०	०	६२॥	०	६२॥

[नारो आपाजीचा काळ होईपर्यंत हे दोन्ही किल्ले त्याच्याच निसबतीस होते. नंतर त्याचा मुलगा रामचंद्र नारायण हा किल्ल्याचा कारभार पाहू लागला.]

श्री.

नकल

अजमास किले पुरंधर व वज्रगड निसबत राजश्री रामचंद्र नारायेण सुा सीत सबैन मया व अलफ रुा

सन खमसचे सालचे

[कारणापुरत्या नोंदी घेतल्या आहेत.]

६०८ सन सीत सितैनात किले मारचा तहनामा करून दिल्हा. त्यात किल्यावर मातबर सरदार आहेत ते येकनिश्चेने आहेत. त्यास कोणास अफ्तागिरे व कोणास दिवटे व पोर्गे व तैनात इजाफे करार करून द्यावे ऐसे कलम लिहिले आहे. त्याचा करार करून देणे होता तो गुदस्ता सन खमसात अवल सालापासोन करार करून दिल्हा. रुा

९२४ किले पुरंधर

९०० इजाफे व अपत्तागिरे

२४ कोंडाजी ना चिव्हे तैनात २ यो बारमाही

२४ बालोजी मिसाल तैनात रुा २ यो बारमाही

२४ कान्होजी जाधव तैनात रुा २ यो बारमाही

7705

२४ नवलोजी नाा सेलार तैनात २ यैाा
बारमाही

९९ संताजी नाा चिव्हे तैनात ९ याो
अकरमाही

९९ डोंगरोजी नाा यादव
२ इजाफा
३ अफ्तागिऱ्या
—अकरमाही

८८ नवलोजी नाा पेठकर
५ इजाफा
३ अफ्तागिऱ्या
—
८

—अकरमाही

२० चाहूजी नाा दगार
२० गणोजी नाा पेटकर तैनात २ याो
दसमाही
२० येसजी नाा चिकणे तैनात २ याो
दसमाही
२० सरखोजी नाा कोढालकर तैनात
२ याो दसमाही
३६ वाघोजी नाा जाधव आफ्तागिऱ्या
आसामी १ याो तैनात, ३ बारमाही
३० संभाजी नाा रामोसी आफ्तागिऱ्या
आा १ याा दसमाही
३० सुभानजी नाा रामोसी अफ्तागिरे
आा १ तैनात ३ याो दसमाही
३० दादजी नाा बेरड आफ्तागिरे रुो
३ याो दसमाहा

———
९००

२४ सुलतान नाक परवारी यास पोर्गा
आसामी १ तैनात रुो २ योो
बारमाही

८२४

८४ किले वज्रगड आफ्तागिर व पोर्गे
३६ बालोजी नाा चिव्हे आफ्तागीर
आ १ तैनात ३ योो बारमाही
४८ पोर्गे आसामी २ तैनात रुाा ४ योो
बारमाही
२४ मकाजी नाा कालकूड २

२४ रुद्राजी नाा ढगारे तैनात २ योो

४८

१०८८४

[समान सबैन मया व अलफ]

किले पुरधर येथील सबनिसीकडील दफ्तरदारी जिवाजी विठल याचे नावे आहे, त्यास ते मृत्य पावले. साा त्याचे पुत्र बापूजी जिवाजी दफ्तरदारीचे कामकाज करीत आहेत, त्याचे नावे साल मजकुरापासून आसामी करार केली असे, तरी याचे हाते दफ्तरदारीचे कामकाज घेऊन वेतनाची नेमणूक आहे त्याप्राो पावीत जाणे.

लिहिणार चांगला असल्यास दफ्तरदारीचे कामकाज घेऊन वेतन पावीत जाणे. येणेप्रमाणे 'करार' करावे करार

[तिसा सबैन मया व अलफ]

किले वज्रगड येथील सबनिसीची आसामी येकनाथ जिवाजी यांचे नावें होती. त्यास ते मृत्य पावले सबब

त्यांचे पुत्र अनंदराव येकनाथ सबनिसीचे कामकाज करित आहेत त्याचे नावे साल मजकुरापासोन करार केली असे. तरी मारनिलेचे हातें सबनिसीचे कामकाज घेऊन वेतनाची नेमणूक आहे त्याप्रमाणे पाववीत जाणे कलम १

[समानीन मया व आलफ]

जगजीवन माहाले हवालदार किले वज्रगड यास आफ्तागीर सालमार दिल्हे

[तपसील]

८४ [सलास सबैन] तुलाजी आगरे यास पोग्याबाा वगैरे नेमणूक जाहाली, परंतु मशारनिले यास किले मजकुराहून दुसरे जागा नेले सबब वजा

[सलास सबैन मया व अलफ]

९२० मोकासे नाईक लोकास व हवालदार व सरनोबत यास तैनातखो नेमणूक आहेत

१०० फिरंगोजी नरसाले सरनोबत किले पुरदर यास मौजे खोपडी ताा करेपठार पौ

३०० बालोजी नाईक चिव्हे संताजी नाा चिव्हे याचे पुत्र यास मौजे देउलगाव ताा पाटस प्राा पुणे पौ

१५० नवलोजी नाा पेटकर यास मोकासा मौजे पडवी ताा पाटस प्रात पुणे पौ

४० नवलोजी नाईक सेलार मौजे भिवडी ताा करेपठार पौ

१०० संभाजी नाईक बेरड मौजे साकुरडे ताो करेपठार पौ

३० कोडाजी नाईक चिव्हे यास मौजे देवढी ताा खेडेबारे.

१०० संताजी माहाले हवालदार किले वज्रगड यास मौजे बिवरी ताा साडस प्रात पुणे पौ मोकासा

१०० मालजी निकम सरनोबत किले वज्रगड यास. मौजे पिसे ताा करेपठार प्रात पुणे पौ मोकासा

केराजी नाईक यादव डोगरोजी नाईक यादव याचे पुत्र याचे नावे मारनिले मृत्य पावले सबब त्यास नेमणूक होती त्याप्रमाणे करार होणे

[तपसील]

[दीपाजीराव येरूणकर यास संन खमस समानिनात छ १३ जिलकादी पथकसुधा हुजूर आणविले]

7708

७९ नारो अनंत परचुरे कारकून निा दफ्तर याणी मौजे खंडाले पाा सिरवल येथे धर्मशाला बाधली आहे तेथील खर्चास जमीन .

५९९१।= हुजूर विल्हे

३४८६ कारकून सिलेदार

३१८६ विसाजी केशव सान्ये पालखी सुधा

३०० भिकाजी केशव सान्ये

[राघो नीलकंठ पानसी]

७२ रामचंद्र त्रिंबक मनोहर यास मौजे बेलसर

[इसने समानीन]

१३५० पालख्या २ येकूण मोईन सालीना

७०० कोंडाजी नाईक चिव्हे

६५० डोंगरोजी नाईक यादव

[१ तैनात=दर माहा; १ रोजमरा; १ मोईन=सालिना; १ खर्ची
[पालख्या

८०० दीपाजीराव येरूणकर

५०० दौलतराव पालांडे

३०० गोविंद बाबूराव भिकाजी केशव यांचे नातू त्यास भिकाजी केशव यास उडते वेतन पावावयाची नेमणूक आहे त्यास मारानिले मृत्य पावले सबब याचे नांवे असामी छ १ जिल्हेज सन सबासमानीनापासून

[2-7-1779

किल्ले पुरंदर

सुाा समानीन छ १७ जााखर किले मजकूर येथील लोकास नवी पालखी व अफ्तागिरी दिल्ही त्याची वगैरे साल मजकुरापासून कलमे

डोंगरोजी नाईक यादव यास पालखीची मोईन सालिना नख्त रुो ६५० साडेसाहासे करार केले असे

मल्हारजी नाईक ढगारे जमाव ढगारे चाकरीची माणू(स) साा तैनात दर माहा रुो

तरी सनद पैवस्तगिरीपासून पावते करणे कलम १

आफ्तागिरी

१ चाहूजी नाईक ढगारे

१ राणोजी नाईक पेठकर

१ कानोजी नाईक जाधव

३—तीन आास आफ्तगिरे दिल्ही सा आफ्तागिऱ्याची तैनात दर ३ प्रो दरमांहा रुो ९ नऊ करार केले असेत. तरी सनद पैवस्तगिरीपासून सदरहू तीन आा नऊ रुो दरमाहा पावते करणे * * * १

८ कदीम

२ इजाफा छ १ रजबपासून

१०

—दाहा रुो पौ कदीम तैनात आठ इजाफा दोन रुो करार केले असेल तरी छ १ रजबपासून पाववीत जाणे कलम १

विा रामचद्र नारायण

सुा समानीन

	दरकदार व कारकून	रुा
३००३	किले पुरंधर	
०	दीपाजीराव येरुणकर हवालदार कबज हुजूर हशमांत शाई सिरस्ता याजकडे होते सबब	
७४०	आपाजी जनार्दन सबनीस	
२९०	फिरंगोजी नरसाला सरनोबत	
२९८	त्रिसाजी केशव फडणीस	
२४९	मल्हार सदासिव कारखानीस	
१७९	बापूजी जिवाजी दफ्तरदार सबनिसीकडील	
२००	धोंडो माणकेश्वर दफ्तरदार निा सबनिसी	
१५०	विठल बलाल	
२००	गोपाल बलाल फडणिसी निसबत कारखानिसी	
१५०	गोविंद मोरेश्वर	
२००	यमाजी अनंत दफ्तरदार निा कारखानिसी	
१५०	हरि नारायण मदतनीस निा कारखानिसी	
१००	विठल राम	
१०९	भिकाजी विश्वनाथ	
३००३		

१८२५ किले वज्रगड

२८० जगजीवन माहाले हवालदार
२२५ माळजी निकम सरनोबत
२९० आनदराव येकनाथ सबनीस
१०० बापूजी आनंदराव फडणीस निा सबनिसी
१८० मैराळ नारायण दफ्तरदार निा सबनिसी
२२५ सदासिव माधवराव कारखानीस
१२५ खंडो नारायण दफ्तरदार निा कारखानीस
१५० अंताजी मोरेश्वर फडणीस निा कारखानिसी
५० भिकाजी विश्वनाथ.
७५ आपाजी मोरेश्वर सभासद

७५० ठाणे माची

२०० आनंदराव थोरात सरनोबत
३०० लक्षुमण गणेश
१५० सदासिव बलाल
१०० महिपतराव लक्षुमण

७५०

३०० मोकासे

१०० जगजीवन माहाले हवालदार किले वज्रगड मौजे बिवरी. ताा साडस प्रात पुणे
१०० फिरगोजी नरसाले सरनोबत किले पुरदर मौजे खोपवडी ताा पाटस
१०० मालजी निकम सरनोबत किले वज्रगड मौजे पिसे ताा करेपठार

१५ जगजीवन माहाले हवालदार किले वज्रगड यास साल मारी अफ्तागीर नवे दिल्हे त्याचे सामानाबाा नेमणूक

हशाम लोकाचा आकार रु.

३५६४७॥ ऐन हशाम आा

५१६ ऐन
२२ पोर्गे
१८ भोई

५५६

7711

ऐकूण

तैनाते प्रो राजमरा रुो मोईन सालिना रुो

३१९९॥ १३५०

—आकार साल मजकूर रु

३७८१६।

तपसील

३३९१३। ऐन आकार मुदत माफक

१२७३॥– मोइनी पालख्या

७०० कोडाजी नाईक चिव्हे

५७३॥ डोंगराजी नाईक यादव यास साल मजकुरी नवी पालखी दिल्ही त्याचा आकार

१२७३॥÷

२७२९।≡ खेरीज कबज

२९५॥≡ दसरियाची वस्त्रे

९८ ≡ अडशेरीं कामगारीमुले

२००९॥= किले वाघेरा तालुके त्रिंबक येथे नामजादीस लोक आहेत त्यास अडशेरी वगैरे

५५॥≡ रोशनाई

१३० मोकासे कोली व बेरड यास

२६२९।≡

१०० जामदारखानापैकी डोंगरोजी नाईक यादव किले मजकूर यास नवी पालखी

दिल्ही सबब पालखीचे वस्त्राबदल आख
पावले त्याचा जमाखर्च हिशेबी जाहला
नाही सबब 'रुजुवातमुळे जाजती जमा
धरून खेरीज कबज खर्च लिहिले ते.
किमत कापड सनगे २ येकूण आक

३२	तिवट	१
६८	जाफरखानी	१
१००		२

२७२९।≡

सुा समानीन

परभार पौ

छ २९ जावल अखेर गुा बालाजी कृष्ण ठोसर कारकून सिलेदार यास सखाराम भगवत याजकडील कसबे सासवड येथील वटेस्वराजवलील वाडा व लस्करचा गोट जप्त करावयासी सागितल. त्याजवरून मारनिल्हेस जप्ती करून वस्तभाव वगैरे किले माराकडे मुदबाख खर्च गुा गणेश दादाजी कारकून निा वाकनीस रसानगी तालेबद येकदर [भांड्याकुंड्याचा तपसील]

सुा समानीन

—येक हजार रुो कमावीस गुन्हेगारी बाा भगवंतराव येरूणकर हे सरकारी चाकर असोन सन सबा सबैनात तोतयाकडे राजमाचीस गेले होते, याजकरिता मशारनिलेकडे गुन्हेगारीचा यैवज सरकारात ध्यावयाचा करार केला ते देविले रुो खेरीज माहालानिहाय जफ्तीबाा सखाराम भगवंत याचा वाडा माचीस आहे, तेथील गुदस्ता जफ्ती करून दागिने वगैरे

आणिले ते बेरीज.

बंदीवान खर्च महिपत बाबूराव व मीर्जा फाजलबेग निा सखाराम हरि किल्यास अटकेस होते त्याजला सन खमस सबैनात जालाऊ

7713

लाकडे पावली ती खर्च पडावयास राहिली याजकरितां सालमारी
खर्च लिा व पाटील वगैरे यास ऐन जिनस मिलोन बेरीज

सुमार
७३६ हत्यारे
५ मर्तबाण किरकोल पौ
६३ जजाला
१४९ बाण
४० तोफा
१६ निमचे
८ कटारी
१४ तरवारा
५ जंबुरे
२ पिस्तुले
१ त्रिशूल
१ सुरा
२ गुपत्या
१ फरसी
३ ढाला
१ कमाण
१ गुरगुज
८ बंदुखा
७ फली भाल्याची
१ दस्तना
१ बरसी
५ रेहेकले
१ बगेदा
१ माडू

७३६

¶*This is an extract describing in detail the administration of Fort Purandhar. It will be noticed from the above extracts how the records of Maratha administration have grown at the Peshwas' Daftar.*

श्री

अंजमास देवस्थान श्री बनेस्वर वास्तव्य मौजे नसरापूर ,ता खेडेबारे सुा आर्बा सबैन मया व अलफ सरसाल खर्चाची नेमणूक

रुपये

३८३ · बदल मुशाहिरा

९॥– अनुष्ठानाकडे देवास नैवेद्य करावयासी व ब्राह्मणाचा स्वयेंपाकास ब्राह्मण आा १ व झाडलोट वाड्याची व भांडी घसणार मराठा माणूस आा १ येकूण दोन यास रोजमारे

५ ब्राह्मण आसामी तैनात दरमाहे रुा ५

४॥– मराठा माणूस आा १ दर माहे रु ५ पो वजा अकरमाही रु.

९॥–

१८।– माळी आा ४ दर माहे दर आसामी रु ५ प्रो रु. २० पैकी वजा अकरमाही १।॥≡

१८।–

४ कुरण्या

३१॥।–

२२० माळी आसामी ४

४८ कुरण्या

६० खटपव्या

५१ मराठा माणूस

३८३

७८ खेरीज मुशाहिरा+

+ The items included under खेरीज मुशाहिरा are mentioned in No. 6 of this Selection on page 37.

१७।≡ निा दक्षणा दररोज रुके

३ देवास

६ अनुष्टानाचा ब्राम्हण व अगांतुक ब्राम्हण यो आ (२ दर ३ पो)

———

९

इा अवल साल ताा अखेर साल मुा माहे १२८ ११ रोज ३७१ पैकी वजा येकूण तिसे रोज ६ व बाकी रोज ३६५ येकुण यकमाही टके ५॥६ प्रो बारमाही पाचरोज टके पैकी वजा ब्राह्मणाचे यकादसीचे रोज २४ प्रो टके ३ बाकी टके ५५।९ दर ३॥। प्रो रुा

———

३।≡ पाने विड्याची

१० देवास

२० अनुष्टानाचा व ब्राह्मण खटपट्या व आगांतुक आा ३—

———

३० दररोज—

११८= दळणावळ खर्च देवास नैवेद्यास व अनुष्टानाचा ब्राह्मण आा १ व खटपट्या आसामी १ व अगांतुक ब्राह्मण आा १ येकूण व माशास कणिक द्यावी लागते त्यास गहू कैली चौसेरी बारुले मापे खंडी १।२॥।८≡ दर पाइलीस रुके ८६ प्रो टके ४१॥९ दर ३॥। प्रो रुा

7716

७३

२०॥ सिवरात्र खर्च

५॥ दक्षणा ब्राह्मणास

रात्रौ कथा लघुरुद्र करावा लागतो त्यास आ ११ दर रु ·॥· प्रो

५ कथेस

४ हरदास मंडळी

२ आपाजी गोसावी

१ मैराळ गोसावी

१ गोविंद गोसावी

४

१ गुरव व मृदग

५

१० भोजनखर्च पानसुपारी

२०॥

१० कुरणातील गवत कापावयास बेगारी

१० वाड्याची शाकारणी

१॥ देवास शेंदूर व तेल

१॥ स्वयंपाकाचे भांडियास कल्हई

२॥ श्रीजवळ ध्वजेचे निशाण दसऱ्याचे दिवशी सालाबाद करावे लागते.

७८

४६१

¶*This is an estimate of one year's allowance, Rs. 461, fixed for the maintenance of the temple of Baneshwar near Nasrapur.*

श्री

[पो पुणे. रु. नं ९४]

देह झाडा पो सुपे नि॥ आनंदराव त्रिंबक सुभेदार सु॥ सीत सितैन मयां व आलफ पो मजकूर देह ४२ यो दरोबस्त

	रु
तनखा बेरीज	४८४८८।=
नवीन वसाहत पेठ भट	१९०८=
गवाण मौजे चोपडज पो तनखा रु॥	
	४८६३८॥

तपसील वाटणी रुो

३८७९७।· यैन तनखा दरोबस्तास दर शेकडा रुो ८० प्रो रु॥

१९३७८॥= मोगलाई दर सेकडा रु॥ ४० प्रो

१९३७८॥= श्वराज्य दर शेकडा रु॥ ४० प्रो रु॥

९६८९।÷ बाबती शेकडा रु॥ २०

९६८९।÷ मोकास बाब दर शेंकडा रु २०

४०

१९३७८॥=

३८७९७।· ―दर शेकडा ८० रुपये

३८७९॥।= सरदेशमुखी यैन तनखीयास दर शेकडा रु॥ १० प्रो रुो

२४२०॥= फौजदारी मोगलाईवर यास दर शेंकडा रुो १२॥ प्रो रु॥

२४२०।= निमचौथाई श्वराज्यास दर शेंकडा रु॥ १२॥ प्रो रु

१२१०८≡ निम चौथाई निमे सरलस्कर

१२१०८≡ निम चौथाई निमे फतेसिंग भोसले

२४२०।=

११६४।= सावोत्रा श्वराज्यावर दर शेंकडा रु॥ ६ प्रो खेरीज (बेरीज?) तनखा

४८६३८॥

7718

पौ परभारा आमल बा तनखा बेरीज

रुा

१०८९३॥≡ िनाा पंतसचिव तनखा बेरीज रुो

९६८९।- बाबती

११६४।= सावोत्रा

१०८९३॥≡

१०८९९॥· निा सरलस्कर तनखा बेरीज रुो

९६८९।÷ मोकासबाब

१२१०८ निमचौथाई

१०८९९॥·

१२१०८≡ निा फतेसिंग भोसले निमचौथाई रुो

२२९६३।=

बाकी तनखा निा सरकार राजश्री पंतप्रधान

रुा

२५६७५८=

ता

१९३७८॥= मोगलाई

३८७५।॥= सरदेशमुख

२४२०॥= फौजदारी

२५६७५८=

पौ वजा दुमालेगाव सिलेदाराकडे व पागाकडे व मुस्छदीयांकडे व इनाम व धर्मादाय आहेत त्याचा सुभा दाखला नाही यैसे देह २१ यो तनखीयाप्रो

जमा रुा

१०५१४८=

7719

तपशील
७९६६।।। मोगलाई
१९९१।।=. सरदेसमुखी
९९४।।।' फौजदारी

१०९१४८=
[पुढील हिशेब घेतला नाहीं.]
[सुा सीत सितैन मया व अलफ]

पैकी वजा
४३२ मिरासपटी तिसरे वर्षी द्यावी ते साल गुदस्तां घेतली, साल मजकुरी द्यावयाची नाही सबब.

¶*This paper records the collection of revenue from a pargana, viz., that of Supa, for the year 1765-66, and is here given by way of a sample of the revenue system of the Maratha days; it enumerates the heads under which the revenue was entered.*

No. 10] [*1750*

घडणी रु. ५१३

श्री

१ तैनात+ जाबता सखाराम भगवंत सुा खमसैन मया अलफ
१५०० पेशजीची मोईन
१००० जाजती

२५००

अडीच हजार देखील रोजमरा करार

१ नेमणूक जाबता राजश्री सखाराम भगवंत सुा तिसा खमसैन मया व अलफ

	नख्त रुपये	कापड आख
खासा	६००००	०
कोन्हेर रघुनाथ	४००	१००

+ A muster-roll of pay or salaries.

कासी रामचंद्र	४००	०
कादार हिरेखाण		
चंदेरीची		
चिमाजी गोविद पा	२००	०
खंबईत मल्लासिवाय		
सदासिव आपाजी पा	३००	०
डबई मल्ल्यासिवाय		
चिंतो राम पा आंक-	३००	०
लेश्वरची फडनिसी		
जकात सुरत आठाविसी	७००	०
धोंडो मुरार डबईची	४००	०
मजमू		
खासा प्रांत कल्याण	३२०	०
पौ भात खंडी १९ वरात		
आहे. दर खंडीस रुा २० प्रो		
	६५६७९॥=	४००

यादी सखाराम भगवंत याजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम द्यावयाचा करार सन सलास सितैनात करून माहाल तेथून दिल्हे. अज बेरीज स्वार २००० दर राउताची सालिना रुा ३०० तीनसे प्रो ६००००० रुो.

यासी सरजाम माहाल व गांव

३२६४१० प्रांत गुजरात [तपसील]

२४९००० प्रात खानदेश [तपशील]

२४५९० किा नेमून दिल्हे. जातील

६०००००

[पुढें बराचसा आवांतर तपशील]

यादी पा राजदेहेर येथील वीस हजार रुपयांची जागीर राजश्री सखाराम भगवंत यास नवाब निजामआलीखान याणी दिल्ही. त्याची सिक्यानसी सनद पाठविली आहे. त्याची कमावीस सरकारातून जगनाथ रघुनाथ यांस सांगितली असे. सुा सबा सितैन मया व अलफ सनदा व पत्रे.

7721

१ नेमणूक जाबता राजश्री सखाराम भगवंत सुा इसने सबैन मया व अलफ तैनातदेखील कापड व शागीर्दपेशा वगैरे मिलोन सालिना खेरीज इनाम गाव व जमिनसुधां बेरीज

नख्त	रुा	वजन	पक्के
९९९२०॥≡॥	तैनात गाव व माहाल मिळाने रुा	८८५	केशर
		८८२	दालचिनी
६६२०॥=	इनाम गाव व जमिनी मिलोन रुा	८१	हिंग
		८२	मेणबत्या
३०९९८	परभारे घेतले सरकारांत समजाविले त्याप्रो सरकारातून करार करून दिल्हे गाव वगैरे	८३८७	
		कस्तुरी	५० तोळे
		कुरणे व दस्तके	
		२ कुरणे	
		४ दस्तके	
		६	

बाग व सेन्या मिलोन

नख्त ———————— रुा

९६७३९।–॥

यादी सखाराम भगवंत याचे स्त्रियाचे बेगमीस गाव वगैरे पेशजी सन समानिनात करार करून दिल्हे त्याची बेरीज बाा करारी यादी सुा खमस समानीन मया व अलफ रुा

[तपशील]

८०००

येकूण आठ हजार रुा गाव व जमीन व इतलाख मिलोन लाऊन दिल्हे होते. त्यास मारनिलेची थोरली स्त्री कासीबाई मृत्य पावली. त्याची सून गोदूबाई व धाकटी जिऊबाई या दोघीचे न बने, सबब हाली सरकारातून सदरहूची वाटणी करून दिल्ही बितपसील.

¶*These extracts summarise the position and work of Sakharam Bapu Bokil during a period of about 30 years.*

7722

No. 11] [5-4-1742

EXTRACTS FROM THE PESHWAS' DIARIES.

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान

छ १० सफर सलास अर्बैन

जामदारखानापैकी खर्च.

मीर्जा हकीमबेग मोगल दिा आलाबिर्दीखान यांजकडून आला त्यास ताा नरसिंगराऊ विठल सनगे

३७॥ चीरा मुकसी १

३० इलाचा जरी १

६२ दुपटा १

३

१२९॥

१४ सफर खर्च

देणें मुस्तफाखान दिमत आलाबिर्दीखान डेऱ्यास आला ते समई वस्त्रे

५१५॥ खासा

१२० चीरा बादली १

२२५ जामेवार बादली १

४०॥ पटका १

७४ किनखाप १

५६ दुपटा १

५

१३५ पुत्रास

३७॥ चीरा मुकसी

५६। जामेवार

४१। दुपटा

देणे भला माणूस दिमत अलाबिर्दीखान सुभा मकसुदाबाद—१३ तिवट १८॥। खसखसी. पिराजी नाईक निंबाळकर-खसखसी ३०-३२।).

छ २३ सफर खर्च.

देणे आलाबर्दीखान सुभा प्रां मकसुदाबाद डेऱ्यास आला ते समई वस्त्रें

१७१०॥ खासा पोशाक सनगे येकूण रुा

२१० चिरा बादली

३९६॥ मंदील पैठणी

२१६ बादली

१८० प्रा १

१५ चीरा मुकसी

९३ तिवटे कलसपाकी

३०, १३, १० — ३

४० तिवट

१९५ जामेवार जरी बादली

२८ जामेवार कुलसपाकी

२१७॥ किनखापे

३० सेलासाधा

६ गोशपेश

९० मीठाबेत (?)

७५ छिटेबंदरी ३

३४२॥। दुपटे

५० पटका अमदाबादी

६२० अलाबिर्दीच्या पुत्रास

१७५ मंदील पैठणी

९०। दुपटा

५७ किनखाप

२९५ जामेवार जरिंदा

३ गोशपेश

तैवज खर्च आलाबर्दीखान डेऱ्यास आले ते समई

३ लवंगा

१ पत्री

५ येलदोडे

१। जायेफल

7724

२३ सफर.

५७७॥ देणे बाइकोस पोशाक
१३५ छिटे जनानी
४८॥ पातल कलसपाकी
१०० शाल्ह किनारदार
८४ दंडिये पातले जरी
४० दुपटा शिकंदोजी
१०६। किमखाब १
६३॥ झुणे जनानी ५ दर १२॥

¶This extract from the Diaries mentions the meeting of the Peshwa and Nawab Alivardi Khan of Bengal with details of dresses presented and men that accompanied.

No. 12] *[17-1-1743*

१ नारो दामोदर यासी प्रां उदेपूर येथील मजमू साल गुा प्रमाणे सालमजकुरी करार करून वेतन सालीना रु ७०० प्रांत मजकूरचे यैवजी मल्हार कृष्ण याजकडून देविले.

१ मल्हार कृष्ण याजकडून संस्थान वोडसे येथील यैवजीं देविले.

१ पिलाजी जाधव याजकडून प्रां नरवेर येथील नजरेचा यैवज येणें त्यापैकीं वैशाखेपूर्णिमेचा हप्ता पैकी देविले.

१ मल्हार कृष्ण याजकडून प्रांत उदेपुर येथील यैवजापैा देविले.

१ बाळाजी मोरेश्वर यासी प्रांत ग्वालियेर येथील मज्मू सालगुदस्तप्राा सालमजकुरी करार करून यासीं पावावयाची मोईन राा भास्कर बलाळ कााादार प्राा माार याजकडून प्रांतमाारचे यैवजी देविले रु. ३००

१ मल्हार कृष्ण यांजकडून संस्थान दतिया येथील फाल्गुन शु. ७ च्या हप्तापैा देविले.

¶The extract given above from the Diary contains a few important names like Malhar Krishna and others. This will illustrate how many useful details can still be gathered from the Diaries.

[26-5-1743

छ १२ राखर आर्बा आर्बैन

राजश्री स्वामीस बरें वाटत नव्हते तें बरें वाटून सदरेस आले साा हतीवर रुप्याच्या हवद्यांत साकर वाटावयासी पाठविली ते साकर घेऊन आले त्यास तिवटे.

13] [7-3-1744

छ ३ सफर आर्बा आर्बैन

रामभट फडके मोरयाचे देवळांत उपोशणें करीत बसला सबब कर्ज वारावयासी धर्मादाय देणें रु. १२१॥=

[27-9-1744

छ १ रमजान खमस आर्बैन

किले चावंड फते जाला अशी खबर आली.

[2-10-1744

छ ६ रमजान खमस आर्बैन

बापूजी बाजीराव सिलेदार यास वस्त्रें दसरियाचीं. चिमणाजी भिवराऊ, गंगाधर, बाजीराऊ, मल्हार बाजीराऊ, यशवंतराऊ चिमणाजी, व जनार्दन बापूजी यांस

[7-12-1744

छ १२ जिल्काद खमस आर्बैन

सखाराम भगवंत सिलेदार रोजमरा निंमे पधरवडा रु. १०

[2-6-1744

छ २ जादिलोवल खमस आर्बैन

सखाराम भगवंत यांणीं जखमेचें पाणी घेतले सबब सनगे.

[9-5-1744

छ ७ रबिलाखर खमस आर्बैन

सटवोजी जाधव दिा पिलाजी जाधवराऊ पाणीयाचे डोहातून पलीकडील कांठाहून अलीकडे आले सबब सनगे.

14] [9-5-1745

छ १७ रबिलावल खमस आर्बैन

भेलसे फते केलियाचीं पत्रें आलीं.

[7-6-1745

छ १७ जावल सीत आर्बैन

दिा तोफखाना मुरारजी घोरपडे याचे लढाईत गाडदी जखमी वगैरे जाहले त्यांस तूर्त खर्चास मोघम रु. २५०

[11-6-1745

छ २१ जमादिलावल सीत आर्बैन

किले रामगड फत्ते जाल्याचें वर्तमान महिपतराव लक्ष्मण यांजकडून आले.

[1-7-1745

छ ११ जमादिलाखर सीत आर्बैन

रसालगड फत्ते जालियाची पत्रें आलीं.

[1-7-1745

छ ११ जमादिलाखर सीत आर्बैन

लोक निा भापकर जखमी व ठार मिळोन मुज्फरखान याच्या टेकड्या घेतल्या तेथें जखमी जाहले त्यांस खर्चास.

[9-7-1745

छ १९ जमादिलाखर सीत आर्बैन

दिा हैदरखान गाडदी लोक सावनूरचे लढाईत जखमी व ठार गोळ्यांनीं जाहले त्यास खर्चास.

[16-7-1745

छ २६ जाावल सीत आर्बैन

स्वारी मातुश्री बाई पंढरपुरास जातेसमयीं खर्चास गणेश बलाल दामले.

[25-7-1745

छ ६ रजब सीत आर्बैन

सैदलष्करखान यांस मेजवानी मोहरा ७१ दर १४ रु.

[17-9-1745

छ २ रमजान सीत आर्बैन

देहनगी रु. ४४ इंग्रज वैद्य पोटास रोज रु ११ प्रो चौ रोजां रा माहादाजी अंबाजी विा मातुश्रीबाई.

[27-12-1745

छ १४ जिल्हेज सीत आर्बैन

देणे दागिने गजराबाई यांसी लग्नामध्यें द्यावयासी तयार केले, राजश्री स्वामी-कडील लग्नाचे.

15] [14-1-1746

छ २ जिल्हेज सीत आर्बैन

पौष शुद्ध चतुर्थी रविवासरे ते छ ३० जिल्हेज माघ शु. २ रविवासरे व पुढील सबंद महिना पेशव्याच्या मुकाम शाहूनगर येथें आहे.

[14-2-1746

छ ४ सफर सीत आर्बैन

मातुश्री बाईची यात्रा श्रीआवढा नागनाथ, परली वैजनाथ, श्रीमनरथ श्रीमुद्गलेश्वर व श्रीजोगेश्वरी छ १९ जिल्काद ताा छ ४ सफर.

7727

[3-6-1746

छ २४ जावल सबा आर्बैन

रघुनाथपंत तिसगावास रा माहादाजी अंबाजीचे पुत्राचे लग्नास गेले. बापूजी भीमराऊ मारनिले समागमे फौज देऊन साष्टीस रवाना केले.

[8-6-1746

छ २९ जावल सबा आर्बैन.

लक्ष्मण बल्लाळ यास फौज समागमे देऊन जुन्नरप्रांतीं रवाना केलें. राजश्री जनार्दन बलाल फडणीस यांस चिरंजिवाचे व्रतबंदाबदल बक्षीस.

[6-8-1746

छ २९ रजब सीत आर्बैन

परदरबार खर्च गुा अमृतराव शंकर ताा नवाब महाबतजंग, नवाब हैबतजंग, बेगम हैबतजंग, जानकीराम दिवाण, बेगम महाबतजंग, दखणी बेगम यांस सनगे.

राजमंडळ सिलकबंद

[12-9-1746

स्वारी राजश्री पंतप्रधान छ ७
साबान खर्च पोतापैकी जासूद
अहद सातारा तहद पुणें डाकेस
ठेविले आहेत त्यास रोजमरा दीड
माही गुा बालकृष्ण श्रीनिवास
सिलेदार रोजमरा छ १६ रजबचा सबा आर्बैन

रुपये

९ जथे बावाजी नाईक ठुबा मुा सातारा
४।। पदाजी गोडसा
४।। त्र्यंबकजी गागरा

२७ जथे लिंगोजी नाईक २७
९ मुा मौजे वरये [तपसिल]
९ मुा मौजे मरढे [,,]
९ मुा मौजे भुईंज [,,]
—— ——
२७ ६

7728

९	जथे मसाजी नाईक मुा कवठे [तपसिल]
२२॥	जेथे त्र्यबकजी नाईक

९	मुा वेल्हे [तपसील]
१३॥	मुा मौजे अजनुज ["]
२२॥	५

१३॥	जथे माहादजी नाईक मुा सिरवल [तपसिल]
९	जथे भिकाजी नाईक मुा किकवी ["]
९	जथे आबाजी नाईक साठ्या मुा मौजे देवढी
९	जथे गुणाजी माणकोजी मुा मोजे गराडे
९	जथे रायेभानजी नाईक मुा मौजे कोढवे नजिक पुणें
११७	२६

[31-10-1749

सुा सबा आर्बैन छ २६ सवाल

खर्च जामदारखाना रवाना मकसुदाबाद बाा अमृतराव शंकर अलाबिर्दीखान सुभा याजकडे सनगे येकूण

रुपये

१८२५।≡	खासा महबतजंग नवाब ऊर्फ अलाबिर्दीखान सनगे याा रुा	[तपसील]
५७३	नवाब हैबतजंग पोशाक	["]
५२१	नवाब नवाजिस महमदखांन	["]
३६९।	नवाब आताउलाखान	["]
१३३॥	जानकीराम दिवाण	["]
५८९	हाजीसाहेब जेष्ट बंधू	["]
४४५	महबतजंगाची बेगमेस	["]
४३०	हैबतजंगाची बेगम	["]
४००	नवाब सैदमहंमद संस्थान प्रयाग	["]

४०३	उदतसिंग जमिदार भोजपुरकर	[तपसील]
१२९॥	राजा किरतचंद दिवाण हैबतजंगाचा	[„]
३१४॥	न्याहाखान पटणेकर	[„]
४२८	होरलीसिंग भोजपूरकर	[„]
३७०	बलवंडसिंग राजा कासीकर	[„]
२३९॥	महतारामजी पटणेकर	[„]
९०६।०	दखणी बेगम पटणेकर	[„]

[23-11-1746

जमा कोठी मुा सातारा सबा आर्बैन

आवजी कवडे याजकडून बटकी आणविल्या त्या मारानिलेनी पाठविल्या गुा सदासित्र उधव व पोरगे सुमार

२ गोजरी बटीक मौजे धानोरे प्रा कलमनुरी येथील कुणबी जातीचे कुणबी उमर वर्ष ३०
  १ बटीक
  १ पोरगा जावजी उमर वरसे २

  २

२ राधी बटीक जातीची चागली मराठी मौजे किन्होले प्रा वसमत उमर ३०
  १ बटीक
  १ पोरगा औधुत उमर वरसे ४

  २

१ कृष्णी बटीक जातीची पंचाल सोनार मौजे सोनपिपरी प्रा उमरखेड उमर वरसे २९ याो

१ कासी बटीक जातीची रजपूत जात चांगली दीपचंद हजारी मौजे बाभुलवाडी प्रा धुले याचे घरची उमर वरसे ३०

१ राधी बटीक जातीची हाटकर धणगर चागले कुणबी पाणी पितात व हातचे जेवितात मौजे ब्राह्मणगाऊ प्रा उमरखेड उमर वरसे २९ याो

येकूण सात

९ बटीक
२ पोरगे
—
७

वाडा मुा सातारा जमा असेत बीा यांदे नारो बलाल कोटनीस कोठीस जमा असेत [छ २० जिलकाद]

[17-11-1746

छ १४ जिल्काद सबा आर्बैन.

अनुष्ठान खर्च सौ उमाबाई यांस बरें वाटत नाहीं सबब पवित्रके जोड सोने वजन ८ तोळे.

[22-11-1746

छ १९ जिल्काद सबा आर्बैन.

चिरंजीव कृष्णराव (उमाबाईचा पुत्र) यास बरें वाटत नाहीं सबब पवित्रके जोड सोन्याचीं करण्यास खर्च.

१२-१२-१७४६

छ १० जिल्हेज सबा आर्बैन.

राजश्री स्वामी कडून राा भाऊ (सदाशिव चिमणाजी) स वस्त्रें जालीं.

¶*Out of these entries for the years 1743-46 one refers to the recovery of King Shahu from a serious illness ; others report the capture of Chavand, Bhilsa, Ramgad, Rasalgad etc. and speak of the pilgrimage of the Peshwa's mother ; while still others give names of important persons such as Mahabatjang, Janakiram Diwan, Said Lashkar Khan, etc.*

16] [*11-1-1747*

छ १० मोहरम (सबा आर्बैन)

धर्मादाय गावास मोर्चे लाविले ते दिवशीं चंद्र प्रीत्यर्थ सुवर्णदान केले त्यास नख्त.

वस्त्रें रवाना संस्थान बिदरूर पोशाख बरांबरी त्रिंबकराव गिरमाजी रु. १७१४॥= बसवापा नाईक राजा वगैरे.

अभयसिंग सा मारवाड यांसी ताा हरि नारायण वकील सनगे रवाना बंधु बख्तसिंग सुद्धां.

[*5-1-1747*

छ ६ माहे सफर सबा आर्बैन

राा माहादाजी आंबाजी कारकून याजकडे चिरंजीव नीलकंठराव याचे लग्नाबद्दल.

[1-3-1747

छ २९ सफर सबा आर्बैन
चैत्र अधिक शुध प्रतिपदा स्वारी सदाशिव चिमणाजी मुाा हल्याळ

[4-3-1747

छ ३ रावल सबा आर्बैन
कृष्णासिंग समशेरबहादर[1] यास हजामतीस.

[7-7-1747

छ ९ जमादिलाखर समान आर्बैन
भिऊबाईकडे सनगे मृत्यु जालीयावरी अंगावर घालावयासी

[15-5-1747

छ १९ जाावल समान आर्बैन
दामोदर महादेव हिंगणे रवाना वस्त्रे हस्तनापुर

१ बादशा आमदशा
१ मलकाजमानी बादशा याची माता
१ वजिराचे पुत्र मोहीनुल्मुल्क व मीर मनू उभयेता
१ मनसूर अलीखान
१ फेरोजजंग उर्फ गाजीउद्दीन
१ खोजे आबजूजखान

[15-4-1747

राजमंडळ

स्वारी राजश्री सदासिव चिमणाजी खर्च जामदारखानापैकी छ १९ राखर — सुाा सबा

वस्त्रे दिाा मुरारजी घोरपडे सनगे बहुमान रवानगी दिल्ही — रुपये

सिदोजी घोरपडे हिंदुराव सनगे		खासा मुरारराव घोरपडे पोशाक	
येकूण रुपये	[तपसिल]		[तपसिल]
बायेकास सनगे रुपये	[,,]	रघुनाथच्यार्य सनगे	[,,]
जिवभट पुराणिक	[,,]	सुभराव मजमदार	[,,]

१ एकाच इसमाचीं हीं दोन नांवें एक हिंदु व एक मुसलमानी ठेविलेलीं होतीं.

रामराव	[तपसिल]
नरसिंगराव यादव	[,,]
श्रीनिवासराव	[,,]
श्रीनिवास कृष्ण दिा हिंदुराव फडणीस	[,,]
सुभराव दिा हिंदुराव	[,,]
सिनापा फडणीस	[,,]
नरसिंगराव जावाई दिा मार	[,,]
रामाजीपंत कारखानिस	[,,]
इनेजखान जमातदार	[,,]
आकोजी जाधव	[,,]
बारगीर आसामी २	[,,]

गंगाधरराव	[तपसिल]
तिमाजी सिकेनिस	[,,]
वेकापा सिकेनिस हिंदुरायाकडील	[,,]
जनकोजी घोरपडे	[,,]
शामराव नारायेण	[,,]
कृष्णाजी माहादेव	[,,]
मानसिंग घोरपडे	[,,]
हिरदेराम परदेसी	[,,]
माहादजी दरेकर	[,,]
इदुलकर याचा पुत्र	[,,]
माहादाजी मल्हार	[,,]
नांव लागलें नाहीं	[,,]

संस्थान सोधे वस्त्रें पाठविली व सदरेस दिल्ही

राजा सदाशिव नाईक	[तपसिल]
सिवया पानवर कारभारी	[,,]
रामाजी मंगेश	[,,]
बसापा	[,,]
विष्णापा	[,,]

अया राज्याचा गुरु	[तपसिल]
वीरभद्र कारभारी	[,,]
हणमंत वीरपा	[,,]
जिवणा नाईक	[,,]
रामाजी मंगेश याचे पुत्रास	[,,]

देणे वस्त्रे दिा आबदुल मजीदखान सावनूरकर यासी दिल्ही येकूण किंमत रुो

खासा नवाब	[तपसिल]
पुत्र आसामी १५	

१ आबदुल हामीद
१ आबदुल अजीद
१ आबदुल करीम
१ आबदुल रसूल
१ आबदुल गनी

बायेकास सनगे	[तपसिल]
कादरमिया मामा	[,,]
आजीदमिया	[,,]
बाक्षिस नग	[,,]
आबदुल कादर	[,,]
अहमदखान	[,,]
गिरधरराव दिवाण	[,,]
श्रीनिवासराव	[,,]

१ आबदुल वसील		देणे स्वामिराव	[,,]
१ आमदखान		सिवराऊ	[,,]
१ आबदुल खलीम		मोरोपंत	[,,]
१ आबदुल समद		मुनंसी	[,,]
१ आबदुल रजाक			
१ आबदुल हलीम			
१ आबदुल सलाम			
१ आबदुल हासन			
१ आबदुल नबी			
१ आबदुल हशाम			

[22-8-1747

छ २६ साबान समान आर्बैन

इंग्रज मुंबईकर याजकडे वस्त्रें रवाना केली बा। आपाजी शामजी सिलेदार सनगे ८ खुद उइलिम वेक जनराल व कपितान मेस्त्र.

[10-10-1747

छ १६ सवाल समान आर्बैन

दि। सिकारखाना रा। भाऊचे रंगमहालापुढें कारंजाचे हौदामध्यें मासे आहेत त्यांस पोटास दररोज एक पैसा.

जमा खरेदी पुस्तक भागवताचे गु। नरसीभट गुजराथी वस्ती अमदाबाद किं. रु. ४००

किल्ले अणकई सन आर्बैनामध्यें फत्ते केली ते समयी नारो कृष्ण यांनीं कापड आणिले ते जामदारखान्यांत अमानत होते त्याची किंमत घालून जमा केलें.

17] [10-2-1748

छ २१ सफर समान आर्बैन

खर्च स्वारी हिंदुस्थान बराबरी घेतले रु. १४९७३१८=

[25-8-1748

छ ११ रमजान तिसा आर्बैन

पुत्रोछाह राजश्री नाना यासी पुत्र जाला व राजश्री भाऊ यासी पुत्र जाला.

18] [22-1-1749

छ १३ सफर तिसा आर्बैन

गोविंद बल्लाळ याचे कन्येचें लग्न जाले त्यास गडगनेर, जावाई बाळाजीपंत.

[23-3-1749

छ १४ राखर तिसा आर्बैन

व्रतबंध खर्च चि. विश्वासराव.

¶*The extracts for the years 1747-49 refer to important activities of the Peshwa in the North and the South as well. Southern expeditions and a few important personages who played part in them are mentioned. The robes that were presented to the Emperor and his relations through Hingne the Maratha ambassador and the expenses incurred for the campaign of 1747-48 are specified. The births and deaths in the Peshwa's family are found noted.*

19] [4-1-1750

छ ६ सफर खमसैन

महाराज रा राजाराम स्वारी शहरांत हतीवर जाली.

[17-2-1750

छ २० रावल खमसैन

राजश्री स्वामी व मातुश्री ताराऊसाहेब घरास आली त्यांस सनगें रु. ३९०३

[21-2-1750

छ २४ रावल खमसैन

गोपिकाबाई यात्रा श्रीहरिहरेश्वर.

दर्याबाई निंबाळकर राजश्री स्वामींची बहीण इची लेक जीवनाबाई यांस नथ दिल्ही.

[22-3-1750

छ २४ राखर खमसैन

सौ उमाबाई यांचे प्राणोत्क्रमणसमयीं धर्मादाय.

[13-5-1750

छ १७ जमादिलाखर खमसैन

गंभीरगड प्रांत साष्टी कोल्याकडील फत्ते केला.

[28-6-1750

छ ४ साबान इहिदे खमसैन

राजश्री कैलासवासी महाराज यांच्या अस्थी नारायेणभट राजउपाध्ये याजबा श्रीस रा केल्या.

मिस्तर ज्यार्ज इंग्रेज वैद्य मुंबईकर यास खर्चास मेजमान रसानगी.

[15-10-1750

छ २४ जिल्काद इहिदे खमसैन

जमा अहेर गर्भाधान सौ जानकीबाई राजश्री रघुनाथपंत दादास

[26-10-1750

(कोकण ज. नं. ६९०)

छ ६ जिल्हेज इहिदे खमसैन

बाळाजी नारायेण भुसकुटे गोत्र गार्ग्य सूत्र आश्वलायन याणीं का पुणियाचे मुकामी येऊन विनंती केली कीं तीर्थरूप अनाजी वामन भुसकुटे आपले चुलते याणी पंतसचिव कैलासवासी यांचे वेळेस किले सुरगड येथील राजकारण करून किला हस्तगत केला. त्याजवरी शामलाने वेढा घालून बसला. च्यार महिने अनाजी वामन याणी किला भांडविला; परंतु सरकारची मदत पोहचली नाहीं. फिरोन सीदीने किला घेतला. अनाजी मजकूर यास काबिलेसुधा दस्त करून नेले होते. अनाजीस सहकुटुंब गोणत्यात घालून समुद्रांत बुडविले. त्याचे संतानपौ येक आपण मात्र सुटोन आलो. * * *

¶*Extracts for the year 1750 refer among several other items to the funeral of King Shahu and the accession of Ramraja. The last one tells us that the Killedar of Surgad was drowned by the Sidi for helping in the capture of that place. An English physician seems to have been requisitioned at Satara.*

20] [3-1-1751

छ १९ सफर इहिदे खमसैन

पथक दि॥ महिपतराव कवडे यास वस्त्रे—बरोबरची मंडळी आनंदराव कवडे, येसवंतराव कवडे, अंबाजी देवाजी, माधवराव जनार्दन, विनायक बाजी फडणीस, बाबाजीराम दप्तरदार.

[21-3-1751

छ ४ जावल इहिदे खमसैन

रामदासपंत भेटीस आले.

[11-3-1751

छ २३ राखर इहिदे खमसैन

श्रीपतराव पिंगळे दि॥ रा॥ राजेश्वरराऊ पिंगळे मोगलाई यांसी वस्त्रें निरोपसमई.

[26-7-1751

छ १३ रमजान इसने खमसैन

धर्मादाव नारायेणभट पटवर्धन विद्यार्थी राजश्री विश्वासराव याजबरोबर पढत असतो त्यास सनगे.

[23-9-1751

छ १३ जिल्काद इसन्ने खमसैन.

राजश्री भाऊकडे डोळ्याचे औषधास गुलाबपाणी.

सौ बयाबाईस ऋतुदर्शन जाहालें त्यांस दागिने.

मेहमानखर्च चिंतो विश्वनाथ सौ बयाबाई यांचे मामा ता हरि विश्वनाथ यांस भोजनास सांगोन वस्त्रें दिल्हीं.

21] [5-7-1752

छ ४ रमजान सलास खमसैन.

देणे जनराल इंग्रज यासी वस्त्रे पाठविली बा सिवाजी रणसोड वकील दि मजकूर ता माहादाजी कृष्ण दि रामाजी माहादेव, नामजाद प्रांत साष्टी.

22] [3-4-1754

¶*Extracts for the years 1751-52 supply a few details about the Peshwa's household, the succession of Mahipatrao Kavde to his father's estates, and the sending of robes to the Governor of Bombay. Two brothers of Trimbakrao Mama Pethe are also mentioned.*

[22-6-1754

छ १ रमजान.

हिसेब कारखाना श्रीबनेश्वर श्वारी राजश्री पंतप्रधान सु खमस खमसैन मया व आलफ इा अवलसाल छ १ माहे रमजान ऊर्फ आशाढ सुध त्रितीया मंदवार शके १६७६ भावानाम सवछरे ता छ ३० मिनहू साबान आखेर शके १६७७ युवा नाम संवछरे जेस्ट शुध प्रतिपदा—

नख्त रुपये ११४२६-८-६

[यापुढें बांधकामास लागलेल्या जिनसांचा व रोकड मजुरीचा वगैरे तपशील आहे. घडणी रु. ६१९]

¶*Rs. 11,426-8-6 were spent far erecting the temple at Baneshwar.*

[29-7-1754

छ ८ सवाल खमस खमसैन.

कमावीस खंडणी सां दिली हा पातशाहा खंडणीचा ऐवज येणें त्याचे वसुलास गंगाधर येशवंत पा आहेत त्यांणीं यैवज तूर्त रवानगी केली रु. २१७००० पैकीं वजा आजी आले नाहीं ३०००; बाकी रु. २१४००० पैकी २९ रमजानी जमा पोता १६४००० बाकी देविले. बा यैवज सां जयनगर नि माधवसिंग याजकडे खंडणीचा बाकी यैवज येणें, त्यापो तूर्त आठ लक्ष रुपये करार केले त्यापैकीं गणेश विनायक व पांडुरंग शंकर व गणेश माली यांनीं एकलक्ष रुपयांचा हवाला घेतला तो ऐवज पावला.

¶*Tribute received from the Emperor and Madhosing of Jainagar is accounted for.*

7737

[26-8-1754

छ ७ जिल्काद खमस खमसैन

कमावीसदार श्रीक्षेत्र कासी यांस सनद कीं वो रा गोपाळ जोसी दीक्षित यांस श्रीमध्ये हवेलींत नवाब मनसूर अलीखान यांनीं धर्मादाव जमीन चारशें बिघे दिली आहे. सांप्रत सरकारचा अंमल जालियावर रा मल्हारजी होळकर व जयाजी सिंदे यांणीं पत्र दिल्हे आहे त्याप्रमाणे सरकारची सनद देऊन चालवावें म्हणून हुजूर दिलीचे मुकामीं येऊन विनंती केली त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी जोसी यांजकडे सदरहू ४०० बिघे जमीन नबाबाचे सनदेप्रमाणे चालविणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन अस्सल पत्र परतोन देणें म्हणोन सनद १

¶*Kamavisdar of Benares is ordered to continue the inam of Gopal Dikshit granted to him by Mansur Ali Khan.*

23] [25-5-1755

छ १३ रजब सीत खमसैन

जनराल बंदर मुंबई यास बाणकोटचे सरंजामास प्रांत राजपुरी पैकीं गाव दिले.

[8-6-1755

छ २७ रजब सीत खमसैन आजम जनराल बंदर मुंबई याजकडे गाव वगैरे दिल्हे त्याच्या सनदा बाणकोटचे बेगमीस. दोन चौक्या हवाली करणे. सदरहू दोन चौक्यांत शामल जंजिरेकर याचा अमल आसेल त्यास दुसरे जागा नेमणूक करणे आणि दोनही चौक्या इंग्रजाचे हवाली करणें म्हणून त्रिंबक विनायक यास सनद. रामाजी माहादेव यास सनद कीं बाणकोटचे सरंजामास ८ गाव द्यावयाचा करार केला आहे त्याप्रमाणे गाव नेमून देणे म्हणून सनद.

¶*Some villages are transferred to the English in exchange for Vijaydurg captured by them and made over to the Marathas.*

24] [9-11-1756

(पे. रो. रु. नं. ७३)

छ १९ सफर सबा खमसैन

गणेश विठल याचे नावे सनद की राणूबाई चवाण दिा हुजरात याची आई सिऊबाई गाडेकर यांस सातारियास शंभर रुपये वर्षास पावत होते. त्यास अलीकडे सन सलासापासून पावत नाही म्हणोन तुम्ही लिहिलेत. ऐशास सिऊबाई कैलासवासी शाहू माहाराज यांची बहिण म्हणवीत होती. सा तिची

१ विधवा स्त्रीनें लग्न केल्यास द्यावा लागणारा कर. २ बेवारशी याची मालमत्ता ताब्यांत घेणारें खातें.

7775

कोतवाल शहर पुणें याणी
हडपसरचे मार्गावर तलें
बांधिले आहे. तेथें उष्ण-
काली पाण्याचा तोटा
पडतो सबब मौजे कोंढवे
बुद्रुक कर्यात मावल येथून
नहर बांधोन पाणी तल्यात
आणावयाबद्दल रा याद
(१) मशारनिल्हे याजकडून
देविले. जाजती खर्च रुपये
सदरहू पंचवीस हजार रुपये
इमाने इतबारे खर्च करून
कचा हिशोब सरकारांत
समजावणे, याप्रमाणें वरा-
तेंत लिहून देविले वरात
छ २९ जाखर.

३९६९४॥-

७२७ शहरांत लोकानीं घरे विकत घेतली त्याचे कबाल्याचा अकार दर सदे १० प्रो ज्याचे त्याचे नांवे खर्च बा सनदा हुजूरच्या रुपये.

४० हरिभक्तपरायण श्रीनिवास गोसावी यासी श्रीवेंकटेशाची स्थापना बुधवार-पेठेंत केली आहे त्याचे नेवेद्य नंदादीपा-बद्दल वर्षासन छ २८ साबान सन खमस

९७१३८-।. महाल मजकूर वगैरे सनदी वगैरे सनदी सुद्धा खर्च रुपये

८०९६॥≡। बा मुा

६२१ कोतवाल

६४० कारकून दरकदार आा ३ यो

+ कबाला = Any deed of transfer of right.

7776

१९२९ कारकून चावड्याचे वगैरे
असामी १०

५२७०॥≡। सिबंधी प्यादे वगैरे
असामी ११८
‿—सरासरी

८०५६॥≡।

१४९७॥=। खेरीज मुा भोजनखर्च तैवजखर्च रोशनाई बंदिवानखर्च बेवारसी मरतात त्यास लाकडे वगैरे कूलखर्च रुपये

१५८॥ घोडे निसबत कोतवाल चंदी वैरण वगैरे

९७१३८–॥

४६१३४॥=॥

बाकी व फाजील रुपये

बाकी रुपये.
१४०९८८॥·

फाजील नहराची वरात पंचवीस हजार रुपयाची जाहाली त्यामुळे रुपये
२४२५॥·

तपशील

८६२ सनवात बाकी
कारकीर्द आनंदराव काशी

१३२३६८॥ किता

१३२३६८॥ इमारत खर्च चावड्या नारायण पेठ व वेताल पेठ येथें नव्या बांधल्या त्याचा खर्च तपशीलवार उगवला नाहीं सबब बाकीस उतरले.

१२००० आनंदराव कासी मार्जी अमलदार याचे फाजील कोतवाली संबंधे सरकारांत आहे येविसी घासीराम याजवरून हमी घेतली आहे त्यास आनंदराव याणी हमीदार गंगाधर शामजी व रंगोबा नाईक सुतवणी यांचे कर्ज देणे त्या ऐवजी ऐवज देविला तो घासीराम याणीं सन अर्बा समानीनांत देऊन वहिवाटीस खर्च लिहिला होता, त्यास सरकारची वरात घेतली नाहीं सबब बाकीस उतरले ते

१३२३६८॥

१४०९८८॥

तालेबंद इजमाईल[+] कोतवाली शहर

¶*These are account sheets of the Kotwali or the police office of Poona managed by Ghashiram in the years 1789-90.*

No. 48] [1795

श्री

नाना फडणीस याचे अमलांत किती न्यायाधीश होते त्यास श्रीमंत कैलासवासी माधवराव नारायणसाहेब पंतप्रधान पेशवे याचे कारकीर्दी इा शके १६९६ ता शके १७१७ पावेतो बेवीस वर्षे चालली त्यांत नाना फडणीस यांच्या कारभारांत मुख्त्यारपणा होता तेव्हा

२ मुख्य न्यायाधिसीचा आधिकार

१ प्रथम रामशास्त्री ते मृत्य पावलियावर

१ आप्याशास्त्री

२

[+] इजमाईल = Abstract or Summary.

शहरात सरकारहुकमाने न्याये इनसाफ ज्याजकडे होत होते त्यास न्यायाधीश असी म्हणावयाची चाल नाही. सरकारातून त्याजकडे मामले व कारखाने होते ते आसामी

१ सरसुभा प्रांत कोकण याचे वरी दरोबस्त कोकणपटीचे इनसाफ जे फिर्यादी येत होते त्याचे होत होते. याजपासी मुतालकी सिका होता. यासी सनद द्यावयास हुकूम लागत नव्हता.

१ जनार्दन आपाजी पुणे सुभा

१ सदासिव केशव दाते

१ सिवराम नारायण थथे

१ राघोपंत गोडबोले

१ त्रिंबकराव परचुरे

१ दुलभसेट गोविंदजी

१ चौत्रा कोतवाली शहरचे खटले छिनाली व चोरी व मारामारी वगैरे किरकोळी

१ धोंडो माहादेव निा नगरकर सुभा

१ दाजीबा फडके

१ माहालोमाहालचे मामलेदार पुणियात राहत असेत त्याजकडे माहालोमाहालचे फिर्यादी येत असेत, त्यांचे इनसाफ तेहि काही काही चुकोत्या करीत असेत.

१ तात्या देशपांड्ये पुणेकर

१ मांडवगणे

१ अनंदराव राम जुनेरकर

१ बहिरोपंत मेहंदले

१ बापूजीपंत बापट

१ जैरामपंत बापट

१ देशमुख फडावरील अधिकारी

१ ढमढेरे दप्तरचे अधिकारी

१ लक्षुमणपंत कोपरकर

न्यायाधीश सर्व फिर्यादीयांच्या अर्ज्या घेत होते कीं नाही म्हणोन, त्यास फिर्यादी वतनाचे कजियाचा अथवा मातबर देणेघेणेचा हुजूर नाना फडणीस यांजपासी मुछदियाचे हतून अर्जी देत होते. नंतर त्याची हकीकत समजून घेऊन जिकडे मनास आणावयास परवानगी होत होती तिकडे

त्या कामाची चुकोती होत होती. येखादा फिर्यादीस समक्षहि जात असे. मातबर कामाची अर्जी सरकारहुकमासिवाय कोणी घेत नवते. लहान लहान कजियाच्या अर्ज्या काही काही मुछदी घेऊन वादी प्रतिवादी यांचे रजावंदीने समजूत जाल्यास करीत असेत. हुजरचे हुकमासिवाय प्रतिवादी यावर शह पोचत नव्हता. यास्तव अर्ज्या हुकुमासिवाय घेत नव्हते.

वतनाचे व देण्याघेण्याचे खटल्याचे फिर्यादी येत असतील त्याजपासून तोंडजबानी समजून घेत होते किंवा लिहून घेऊन मनास आणीत होते म्हणोन, त्यास वादीप्रतिवादी यांची लिहिली घेऊन वाके समजून दाखले कागदपत्र व भोगवटे व साक्षीदार यांची लिहिली घेऊन मनास आणीत होते. तोंडजबानी समजून मनास आणावयाचा सिरस्ता नव्हता.

प्रतिवादी हजीर होण्याकरितां ताकीदचिठी पाठऊन आणवीत होते किंवा सिपाई पाठऊन बगरचिठी आणीत होते किंवा वादीच बोलावीत होता म्हणोन, त्यास प्रतिवादी शहरातच आहे तर त्यास सिपाईबार चिठी पाठऊन आणवीत होते. हरगांवी आहेत त्यास पत्र हुजूरचे अथवा ज्याजकडे+ मनास आणावयाची आज्ञा होईल त्याचे सिपाई याबरोबर जाऊन त्यास आणवीत. फिर्यादीन मातबर आपराध समाजाविला तर असामी व आपराध पाहून मसाला होत होता, वादीच बोलावीत होता असी चाल नवती. ताकीदच होणे तर वादियापासी देत होते. इनसाफाने प्रतिवादी खरा जाहाल्यास मसाला परत देवीत होते. प्रतिवादी हजीर न जाल्यास त्याजला कोणत्या रीतीने आणीत होते; त्यास प्रतिवादी यास पत्र व सिपाई गेला असता हुकूम मोडून प्रतिवादी हजीर होत नव्हता असे बहुतेक अढलात नाही. कदाचित कोणाचे हिमाइतीने न आल्यास हुजूर विनंति करून त्यासी हुजूरचे पत्र पाठऊन आणवीत होते. गैरचालीने आंगबले मगरुरी करून सरकार हुकूम तोडून न आल्यास त्याचें घर वतन जप्त करून आणवित होते.

प्रतिवादी न ये सबब फिर्यादीचेच येकून हुकूमनामा देत होते अथवा प्रतिवादी आल्यावाचून काम बंद पडत होते कीं नवते म्हणोन, त्यास प्रतिवादी न ये ऐसे बहुधा होत नवते. कदाचित प्रतिवादी कोणा सरदाराचे वगैरे हिमाइतीने न आल्यास बहुधा मनसुबीचे काम बंद पडत होते, फिर्यादीचेच ऐकून हुकूमनामा होत नवते. येखादे समई हुकूमनामाहि देत होते. मनसुबीतून वादी गैरहजीर जाहाल्यास फिर्यादीचे साधनाची पुरघणी पाहून बलवत्तर आहे असे दिसोन आल्यास हुकूमनामा देत होते. त्या हुकुमनाम्यात

+ The magistrate trying the case.

वादी गैरहजीर जाहाला असे लिहीत असत, कारण की कालेकरून प्रतिवादी हजर होऊन पुन्हा इनसाफ न खरा जाहाला तर सवड असावी म्हणौन दर्ज्या ठेवीत होते.

प्रतिवादी आलियावर मनसुबी होणे ती न्यायाधिसीकडील कारकूनच मनास आणून चुकवीत होते किंवा खासा न्यायाधीश खुद बसून काम सुनावीत होते, पंच बसवून मनास आणीत होते किंवा आपणच बसून काम सुनावीत होते म्हणून, प्रतिवादी आलियावर न्यायाधीश याचे कारकून बसून हरदूजणांची लिहिली घेऊन त्याची साधनसूत्रें पाहून कलमाकलमाचे सवालजाब घेऊन चौकसी करीत असेत. मधेमधे खासा न्यायाधीशहि बसत असेत. सारी चौकसी जालियावर हरदूजणाचे रजाबंदीनेच पंच बसऊन खासा न्यायाधीश बसून हरदूजण वादीप्रतिवादी याची जितकी बोलणी असतील तितकी संपऊन पंचाचे व आपले विच्यारे जो वाजबी निर्णय ठरेल त्याचा सारांश करीत असेत. येकटे न्यायाधीशच बसून इनसाफ होत नव्हता. अग्रहाने येकादे जाहाल्यास आणखी फिर्याद पडल्यास त्याची उलट होत होती.

देण्याघेण्याचे खटल्यांत प्रतिवादी खतास नाकबूल होऊन वाद सांगूं लागला तरी त्याची चौकसी साक्ष मौजे पाहून करीत होते किंवा खत व तोंडचे बोलणेच प्रमाण धरून ठराव करीत होते म्हणोन, त्यास ज्याचें फिरयादी अथवा अधीच घरी सावकारी चालीचे लिहिणे वहीचे असल्यास त्याचे वहीचे जमाखर्च पाहात होते. दोघांचे घरी वहीचे वगैरे लिहिणे खातरजमेचे दिसोन आल्यास साक्ष पाहात होते. साक्षी नसल्यास प्रतिवादी शफतेस राजी जाहल्यास शफत घेत होते. केवल तोंडचेच बोलणे ऐकून शेवटास नेत नव्हते. जेथवर चौकसीची नजर पुरेल तेथवर पाहात होते. खरे अथवा खोटे काहीच समजत नाही आणि खत तर आहे असे जाहलेस तोडमोड करून काही थोडीबहुत देऊन फडशा करीत होते. वादी अथवा प्रतिवादी पंचास राजी नाही खावंदानीच करावे असें म्हणू लागल्यास कसे करीत होते म्हणून, त्यास वादी अथवा प्रतिवादी आपले रजावंदीनेच पंच सांगत नाही, खावंदानीच करावे असें म्हणू लागल्यास, खावंदानी च्यार शाहाणे माणूस समजेस घेऊन त्याचे विचारे चौकसी करून ठराव करीत होते. केवल खावंद येकलेच बसून शेवटास नेत नवते.

वादाचे फडशाचा सारांश होता तो वादी प्रतिवादी याची लिहिली व साधनसूत्र व साक्षीमोजे जमा धरून सारांशात हुकूम आणीत होते किंवा मोघम

हुकूमच लिहीत होते म्हणोन, त्यास चौकसी शेवटास गेल्यावर जो खरा होईल त्याचा वाखा प्रथम लिहून नंतर खोटा होईल त्याचा वाखा लिहून दोघांची साधने कागदपत्र लिहून व साक्षीदाराची लिहिली घेतली असल्यास तीहि लिहून नंतर त्याचे वाख्यातील कलमे कलमेवार त्याचे वर त्याचे साधनसूत्राचे कागदपत्राचे दंशाची कलमे वेगली लिहून त्याजवर जो खरा होईल त्याजकडील कलमाचे साधनाचे परवानगीने गुण येतील ते लिहून गुणदोषव्यवस्थापूर्वक निर्णय करून शेवटी ठरावाचा मार सेवट्यास लिहीत होते. नंतर मखलासीची खावंदाची हाते होती, त्यात हुकूम लिहीत होते.

देण्याघेण्यांचे+ खटल्याचा फडशा जाल्यावर ज्याजकडे ऐवज येणे ठरला त्याजकडून ऐवज सावकाराचा आदा होणे तो त्याची मालमवेशी विकून देत होते किंवा फडशाकरिता पर्जात ठेवीत होते म्हणोन, त्यास ऐवज घेणे ठरल्यावर त्याचा हालमाल पाहून घर वतन मालमवेसी विकूनहि फडशा होत होता अथवा ऐवजास सालबंदी करून ऐवज पाहून दाहापाच वर्षात सोईसोईने घर वतन गाहाण लेहून देऊन निकाल होत होता. काहीच जवल नसल्यास खतपत्र करून पुढे सामर्थ आल्यावर घ्यावे असेहि होत होते. कुलाची केवल नादारी दिसोन आली तरी दाहापाच सात आठ वर्षे सावकारानी तगादा करू नये म्हणोन सरकारातून अभय देऊन उदीम व्यापार करवीत होते. बच्यात्र होऊन आब राहून निर्वाहहि करवीत होते. देण्याघेण्याकरितां पर्जात ठेवीत नव्हते व सावकाराचा येल्यार कुलावरील दूर होत नवता. अतिनिकर्ष कुलावर होऊ लागल्यास तगादा करू नये, धीरे धीरे घ्यावे म्हणोन ताकीद होत होती. पंच्याईत करणार यास काय मिलत होते म्हणोन, त्यास पंच्याइंतीस चांगले संपन्न लोकच बहुधा ते पंच्याइतानी मिलकतीचे कलेनेच पंचाइतीत बसावे असा सिरस्ता नाही. वाजबी इनसाब करावा त्यात जो खरा होईल त्याणे आपले संतोषाने पंचाचा श्रम आपल्या कामावर जाहला असे स्मरून काही दिल्हास घेत होते. सता करून घ्यावयाची चाल नव्हती.

नाना फडणीस यांचे अमलांत वतनाचे कजिये किती होते व त्या आलीकडे बाजीरावसाहेब याचे अमलात किती होते म्हणोन, त्यास नानाचे अमलात हुजूर न्यायाधिसीकडे व सरसुभा प्रांत कोकण व माहालोमालाचे मामलेदार पुणियात होते त्याजकडे मिलोन येकंदर कमपेश दोनहजार पावेतो कजिया होता असे त्या कालीच ऐकत होतो.

+ End of an affair as of a law-suit.

7782

पाच हजार रुपयावर देण्याघेण्याचे काम किती दिवसात चुकत होते व पाचा हजारा आलीकडे किती दिवसांत व त्याहून शंभर पनास रुपयाचे किती दिवसांत चुकत होते म्हणोन, त्यास लहान तंटे तर महिना पंधरा रोजात जसी मनास आणणारास फुरसद तसे चुकत होते. पाच हजाराचे व पाच हजारावर किती दिवसात याचा केवल नियम नाही, परंतु दोन वर्षाचे आत सरासरी देण्याघेण्याचे तंटे चुकत होते. वतनाचे कजियाचा फडशा पाचा वर्षापुढे दाहावर्षे बारावर्षे पंधरा वर्षे वीस वर्षे पावेतो होते होते. चौकसीमुले दिवसगत लागला असे येखांदा कजिया हिमाइतीने व लांच घेऊनहि लांबणी-खाली पडत असे. फिर्यादीची अर्जी सरदार लोकावर कज्या पाहून मुदत लागत होती, चालत होती किंवा नाहीं म्हणोन, त्यास नानाफडणीस याचे कारकीर्दीपावेतो सरदार लोक यांवरहि फिर्यादीची अर्जी चालत होती, बंदोबस्त होत असे. येकादा जाबसाल सरदार याचे भिडेने सेवटास जात नसे. बहुधा बंदोबस्ताची पैरवी होत असे.

पुणियातील पंच्याइतीचे सारांशावर पंचाची नावनिसी पडत नव्हती, कदाचित येखादे सारांशावर नावनिसी पडली असल्यास पडेल, परंतु ज्याची त्याची हातची अक्षराने लिहावयाची चाल नवती.

ठरावाचा सारांश जाहाल्यावर जो खोटा केला त्याची फिर्याद हुजूर पोहचल्यास हुजूर चौकसी होत होती अथवा दुसरीकडे मनसुबी तोडावयास परवानगी होऊन चौकसी होत असे.

वतंदारीची पंच्याईत करावयास देशमुख देशपांड्ये माहाल मजकूरचे अगर परमहालचे वतंदार बसऊन इनसाफ करीत असेत.

पक्षपाताने अगर नजर चुकोन येखादा इनसाफ गैरराह जाला असें चौकसीने जाहाले असतां दुसरेयाणे इनसाफ वाजवी करऊन विल्हे लावीत असेत.

देण्याघेण्याचे अगर वतंदाराचे पंच्याइतीचे कामास कारकून व प्यादे मनसुबी सेवटास न्यावयास नेमून दिल्यास त्या कारकुनांस व प्याद्यास रोजमरा सरकारांतून बांधून देत होते. त्याप्रो हरदू वादी यांकडून निमे निमे प्रो देवीत असेत.

वतंदाराचे कजियांत मनसुबीमुले जो खोटा होईल त्याजपासी गुन्हेगारी व खरा होईल त्याजपासी हरकी वतनाचें उत्पन्न व वाद्याची ताकत पाहून घेत होते.

ठरावाचा सारांश जाल्यावर त्याजवर इनसाफ करणाराने मखलासी करावी. नंतर तो सारांश हुजूर दाखल होऊन त्याजवर द्यावे कारभारी याचें व देणे खावंदाचे होऊन त्यानंतर सनद असल्यास सरकारचे फडणिसाकडील पत्र असल्यास चिटणिसाकडून पत्रे लिहून तयार होऊन चिटणीसी पत्रावर चिटणिसाची

तरीख व सनदेवर फडणिसाची तरीख होऊन मुजूमदार याचे निशाण होऊन नंतर हुजूरचा सिका होत असे. पत्रे दफ्तरी बार होत असेत.

देण्याघेण्याचे खिसे

१ माहालसंमधे मामलेदार याचे हिसे रसीदीचे व फाजील बाकीचे परस्परे तंटे, वरातीचे जाबसाल यांची चौकसी दफ्तरचे अधिकारी देशमुख व ढमढरे यांचे विा दफ्तरांत होत असे.

१ वहीवाले उदमी साहुकार सराफ व कापडकरी यांचे खटल्याचे चुकोतीस वहीवाले सावकार, सराफा व कापडकरी बसवीत असेत.

घर गाहाण व वतनें गाहाण यावर ऐवज येणे त्याचे तंट्याचे जाबसालास च्यार वतंदार व शाहाणे माणूस तिराईत परनिष्ट बसून इनसाफ होत आसे.

वतनाचे कज्याची फिर्यादी उभा राहिल्यास त्याचा भोगवटा वतनावर किती दिवस नाहीं असे पाहून जर शंभर वर्षे वतनावर भोगवटा नाही तर सर्वथा निर्वेध पाहून मनास आणीत होते. निर्बाध भोगवटा बहुत दिवस चालत आला असल्यास फिर्यादीच अर्जीवर प्रतिवादी याची कतबा घ्याबा, येविसीची विच्यार पंचाचे मते करून मग कतबा घेत होते. कतबा न घ्यावे ऐसे न जाल्यास घेत नवते. मनसुबी तर करावी, परंतु वेतन जफ्ती न करितां करावी, असाहि पर्याय समजत होते, व वेतन जफ्त करून मनसुबी करावी ऐसे दिसोन आल्यास तसे होत होते. अधिकार पाहून होत होते.

न्यायाधिशीचे दफ्त(र)चा सिरस्ता कसकसा होता म्हणून, त्यास रामशास्त्री याचे कारकीर्दीत शास्त्री याचे हाताखाली अमीन व दफ्तरदार होते.

३ अमीन क्रमेकरून जाले से

१ प्रथम मोरो हरि ते मेल्यावर

१ त्रिंबक हरि वर्तक. ते मेल्यावर

१ दादो हरि मराठे

३ ————————— यो आमीन

३ दफ्तरदार

१ कृष्णराव गंगाधर

१ आनंदराव कृष्ण

१ लक्ष्मुमणपंत कुलकर्णी पेठकर

३

7784

येणे प्रो आमीन व दफ्तरदार होते. फिर्यादीची अर्जी व प्रतिवादीची जबानी ज्याची त्याणी लिहून आणावी. ती अमीन याणी पाहून दफ्तरदार याचे हवाली करावी. दफ्तरदार याणी ती अर्जी पाहून प्रतिवादी यास पुसावेंयाचे सवाल निवडून काडावे, त्याचे जाब लिहून घ्यावे व साधनाचे कागदपत्र असतील ते वादी प्रतिवादी याचे अमीन याणे पाहून, त्याच्या नकला ज्याच्या त्याच्या हातच्या घेऊन दप्तरांत नकला ठेवावे. त्याची चौकसी दफ्तरदार व अमीन याणी करावी. कागद दफ्तरांत राहात असेत. अमीन वादाचे कागदपत्राचे प्रकर्ण संगतवार दप्तरांत राहावें. याप्रमाणे प्रकर्णाचे प्रकर्ण रुमालांत असेत. नंबर लागून मनसुबी सुमारी झाडा लागत नवता. चौपडींचे सिरस्त्याचा सूड नवता. फडशाचा सारांश दप्तरांत नकला राहून असल सारांश चिटणिसाकडे मखलासी होऊन पत्रें तयार व्हावयास जात असे. अमुक पंच्याइती आल्या, त्यांतून अमुक फडशा पडले, अमुक बाकी राहिले असी लिहिणेची चाल नवती.

वतनाचे कजियाबदल साक्षीदार यांची लिहिली घेणे जाल्यास, वतनदार असतील त्याजला देवालई अथवा कृष्णा, भीमा, गंगा या नद्यांचे श्नान घालून त्याच्या सख्या+ लिहून घ्याव्या असी चाल वतनदारीचे साक्षीची आहे, आणि देण्याघेण्याबाा साक्षी घेणे तरी साक्षीदार याची चाल पाहून आत-सोइरा असल्यास त्याचा विच्यार करून नंतर काम पाहून शब्दानेच सत्याकार बोलून शफत घ्यावी असी चाल होती. अथवा सभेंतच बेल-भंडारा तुलसी ठेऊन पुसावें असेहि होते. अथवा ब्राम्हणाचे पायाची शफत करीत होते. असा सांप्रदाय आहे.

सिवेचा कजिया असल्यास सरकारांतून अमीन व सिपाई नेमून देऊन हरदू दाईमुदाई यांची लिहिली व सिवेचे नकासे व साधनाचे कागद, थल झाडे वगैरे सुधा घेऊन नंतर भंवार गांवचें पांच गांवचे पाटील व प्रांत मजकूरचे देशमुख व देशपांड्ये जमा होऊन सीमेचे जमिनीवर जाऊन जमीन दाखवितील ती सर्वांनी नजरगुजरा करून नंतर इनसाफाने पंचास विच्यार फैसला न जाल्यास हरदू गांवचे पाटील यांतून जो दिव्यास राजी होईल त्याणे सिवेवर दिव्य करावें येणेप्रमाणें :—

पाटील अथवा माहार सिवेवर दिव्य करून चालतो :

१ घागर घेऊन चालतात.

+ साक्षीपत्रें.

१ कातडे बोले घेऊन चालतात.

१ नुसते बेलभंडार सिऊन चालतात.

¶*This is a very important document containing details of procedure in legal cases during the time that Nana Fadnis was in office. It describes how plaints of different natures were received, stamped, enquired into and finally decided and the claims of the parties adjusted. It also mentions the several officers, the Chief Justice and his subordinates and the duties that were assigned to them.*

No. 49]

श्री

राजश्री हरिपंत तात्या गोसावी
यांसी

८ अखंडितलक्ष्मीअलंकृत राज़मान्य स्नो जानराव धुलप मुा जंजिरे विजयदुर्ग कृतानेक दंडवत विनंती—येथील कुशल ताा छ १९ राखरपावेतो जाणून स्वकीय लेखन करीत असावें विशेष. दर्यावर्दी यांस आगाव द्यावयाबदल सालमजकूरपैकीं पंचवीस हजार रुपये पाहिजेत येविसी हुजूर विनंती लिहिली आहे. तरी आपण हुजूर विनंती करून साल मजकूरच्या यैवजी रुा पंचवीस हजार तूर्त देवावे म्हणजे आरमार तयार लौकर होईल व कपितान सरईवर सापडला आहे तो सुटावयाचा संदर्भ त्याचे बाइकोकडून आला आहे. त्याविसी हुजूर लिहिले आहे त्याचा जाबसाल घेऊन पाठवावा. बहुत काये लिहिणें कृपा लोभ कारावा हे विनंती.

¶*Janrao Dhulap requests Haripant for funds to fit out his ships for the sea.*

No. 50] [*Date uncertain.*

श्रीगणपति

सेवेसीं परशराम रामचंद्र कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १६ मोहरमपावेतों स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनी छ २० जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावलें. त्यास पत्रीं आज्ञा कीं धोंडजी वाघ याचा भाऊ सिदोजी वाघ याजकडील जप्तीचीं घोडीं तुम्हांकडे आलीं आहेत त्यांचे सरकारांत प्रयोजन असे; तरी जप्तीचीं घोडीं

7786

आलीं असतील तीं पाठऊन देणें म्हणून आज्ञा. त्याजवरून सिदोजी वाघाकडील घोडीं व बंदीवान व हत्यार वगैरे चीजवस्त जप्तींत आली होती ते व घोड्यांस तासगांवास नवें सामान खरेदी करून दिल्हे त्यासुधा बितपशील :

घोडीं रास ५६

पैकीं वजा रास

१ घोडीं जर्दी आजारी सबब ठाणें हट्टूर तो। सावनूर येथें बरीं करावयास ठेविलीं.

२ मौजे कलोल परगणे हुकेरी येथें आजारी सबब बरी करावयास ठेविलीं होतीं, ते रास ३ पैकीं वजा घोडी निली मयेत रास.

१

बाकी रास दोन हली पागा दिमत नारायणराव भिकाजी यांजकडे ठाणें हिरेकुडी पो। हुकेरी येथें बरी करावयास ठेविली.

घोड्या मादवाना रास

१ घोडी कुमैत

१ घोड्या निल्या रास २ पैकीं मयेत येक बाकी रास

२

६ घोडीं आजारी आहेत त्याचा वाटेनें निभाव होणार नाहीं, याजकरितां पागा दिमत मालोजी कापसे याजकडे बरी करावयास दिल्ही आहेत, तीं तासगावीं आहेत. रास

सिदोजी वाघ व घोड्यावर बारगीर होते ते वगैरे बंदीवान आसामी ५३

हत्यारें वगैरे दागिनें

४९ हत्यारें

४१ तरवारा धोपी व निमचे

१२ धोपी

२८ निमचे

१ सुरा

४१

२ पटे

६ बंदुखा तोड्याच्या

४ गजासुधां

२ गज नाहींत त्या

६

४९

४ सिंगडे

३ ढाला

१ रोझडी

१ बुदल्याची

१ गेंड्याची

३

7787

४ मादवाना
३ घोड्या कुमैत
१ घोडी कर्डी सुरकी
—
४
१ घोडा कुमैत
१ तट्टु कुमैत
—
६

१ दिमत तोफखाना याजकडे आनंदराव माधव कारकून याची पहिली घोडी बसावयाची मयेत जाली. सबब हालीं जतीपैकीं घोडी कर्डी मशारनिलेस बसावयास छ २९ जिल्हेजीं दिल्ही ते.

१ लिंगापा निलगर वा। पेठ लखमेश्वर पो। मजकूर याजकडील घोडी रास दोन लखमेश्वरचे पेठेवर धोंडजी वाघानें जमावसुधां येऊन, झांबडाझांबड केली ते समई घरातून नेली. त्यापैकीं हालीं घोडी बोर पंचकल्याण निलगर याणें आपली म्हणोन वोलखिली. सा। त्यास माघारी दिल्ही ते छ ७ मोहरम.

४ मयेत जाली व कृष्णेत बुडाली.
२ मयेत जाली
१ घोडी निली मौजे कलोल येथें घोडी ठेविली होती त्यापैकीं रास
१ घोडा बोर तासगावास मयेत छ १२ मोहरम
—
२

7788

२ पडदली
१ पिवले आत लसने मढीव कचक रुप्याची येक येकूण
१ सार्धे
—
२
—
५८

बैल सर पांढरा सिंगें झुकर्ती, वली मूठसुधां.
१

तांब्या पितळीचे व लोखंडी दागिने
१६ भांडीं
१० तांब्याचीं
५ पितळेचीं
१ तवा लोखंडी थोर
—
१६

९ उपकर्णी देवाचीं
१ मुद्रा तांब्याच्या जोड
—
२६

देव
७ शालग्राम
२ हमणंताच्या मूर्ती लाहान
—
९

सनगें सेला पागोटें व चोलने गजनीचे व रेजे मिलोन येकंदर सुमारी ११
सोने रुपें वजन तोळे

२ घोड्या कृष्णा उतरतां बुडाल्या. येडूरच्या उतारावर.
१ कर्डी
१ कुमैत

२

४

१९

तपशील
२ नर
१२ मादवाना
१ तट्टु

१९

बाकी रास ४१

तपशील
१३ नर
२५ मादवाना
३ तट्टु व तटाण्या
१ तट्टू
२ तटाण्या

३

४१

।।१ भिकबाळी कानांतील सोन्याची, मोत्यें बारिक पांच येकूण. वजन २॥। वाळा रुप्याचा पायांतील येक येकूण

३८।१
रेसिम पांढरे कचे वजन पक्के
८८८१॥
घोड्याचें सामान सुमारें
३२८ जती पैकीं घोडीं आलीं तेव्हां सामान घोड्यावर आलें त्यापैकीं खोगरें व तंग तोबरे व लगाम रिकिब जोड सरोसरा वगैरे.
६० हालीं तासगांवास खरिदी करून दिल्हे ते
२२ तोबरे तरटी
१४ चवाली झुली
१४ पायबंदास चरांटें
१० खरारे लोखंडी
६०

३८८

येकूण घोडी रास येकेचाळीस व त्रेपन आसामी बंदिवान व हत्यारें वगैरे अठावन व बैल सर येक व तांब्याचे पितळीचे व लोखंडी दागिने सत्रीस व शालग्राम सात व हणमंताच्या मूर्ती दोन व सनगें रेज्यासुधां सुमारी अकरा व सोने रुपें वजन तीन तोळे पाव मासा येक गुंज व रेसीम पांढरे वजन पक्के दीड टाक व घोड्याचें सामान सुमारी तीनसेंअठैसी येणेप्रमाणें

राजश्री आबाजी रघुनाथ बाम कारकून गाडदी निसबत गंगाप्रसाद याजबरोबर पाठविले आहे. समागमें रखवालीस राजश्री यज्ञेश्वर नारायण व हस्तीराम यांजकडील गाडदी आसामी १४० येकशेंचालीस दिल्हे आहेत. त्यास सदरहू घोड्याची वगैरे मोजदादीची तपशीलवार यादी आलाहिदा आहे. त्या प्रमाणें सेवेसीं येऊन पोहचेल. घोड्याचे चंदी वैरणीस व बंदीवानाचे पोटास खर्चास रुपये २०० दोनसें रुपये आबाजी रघुनाथ यांचे तसलमातीस लिहून दिल्हे आहेत; व घोड्याचे चाकरीस पोर्गे व पाणी पाजावयास येक पखाली व

(अपूर्ण).

¶*Parashram Ramchandra Patwardhan gives a list of horses, weapons and prisoners captured in a battle with Sidoji, brother of Dhondji Wagh.*

No. 51]

[पहिले चार बंद गहाळ.]

१	बुगड्या जोड	४८
१	घोस बाळ्या जोड	५८
१	चिंचपेट्या	१९३
१६		८७२

जमा जिराईतखाना

हत्यारें	सुमार	हरजिनशी दागिने
६ तीर		१ तरकस
३ कमाण		२ शिंगडे
९ ढाला		२ चिलखतें
२ गुप्ती		२ रजकदाण्या
९ कटारा		५० मारा फतरी
२३ निमेचे		१ पकवाज
६ पट्टे		२ टोप चिलखताचे
४ बंदुखा		६०

7790

१० तरवारी	१४९९ भालेकाठ्या
१ बिचवा	
२ फरशा	१४९९
१ गुरगुज	लोखंडी दागिने
१ पेशकबज	१ खोबळा
१ वागनखी	१ नळी बंदुखीची
१ सुरी	२ परज
२ पिस्तोल	२ टोप लोखंडी
१ खंजीर	१ फळी भाल्याची
१० भाले	
	७
८८	दागिने सुमार १६१०

¶*This paper mentions a few of the weapons that were in use in war.*

No: 52]

श्री

सेवसी अर्जी जमीदार व रयेत परगणे अंकलेश्वर प्रांत गुजराथ विज्ञापना ऐसीजे, परगणे मजकुरची मामलेत साल गुदस्ता तुलसीसेटकडे सांगितली; त्यास जमाबंदी जबरदस्तीनें जलेल करून वगैरे उपद्रव केले. त्याची अर्जी पेशजी साहेबाकडे दिल्हीच आहे त्याजवरून ध्यानांत आलेच असेल. सालमजकुरी त्याजकडेच मामलत राहिलियाने गुदस्ता तोटाच आला, व सालमजकुरीहि मखितयाप्रमाणे लावणी नाहीं, पुढें मामलेतीचा बंदोबस्त न जाल्यास माहालची खराबी होईल, याचे कारण काये म्हणोन धनी म्हणतील, त्यास तुम्ही सेटीची कर्मे येणेप्रमाणें बितपशील:

१ रयतेच्या बायेका तुलसीसेटीचे कारकुनानीं धरून नेऊन बलेच जुल्म केला.

१ ब्राम्हणाची बायको विधवा स्त्री जुलमानें धरून नेऊन बलात्कार केला ते सर्वास कललियावर त्या बायकोस जातीबाहेर टाकिली आहे.

7791

१ जमिदार पुण्यास साहेबाकडे फिर्याद आलियावर पाठीमागें आमच्या बायका धरून नेऊन आटकेस ठेविल्या. सरकारचे दरकदार होते त्याणी सांगितलें कीं जमीदाराच्या बाइका आणून आटकेस ठेवाव्या हे ठीक नाहीं. परंतु तुलसीसेट न अईके.

१ कुसबंडीचे बैरागी याचे सुनेची तुलसीसेटीचे कारकुनानें थाने धरली.

१ रोहितकर पाटलास प्यादियानें निराअपराधे तरवारीचे झडके मारिले, याजमुळे क्षते पडली.

१ कालू कागदी याची बटीक तिसी गुलामाने बदकर्म केले. बटकीचे व गुलामाचें बदकर्म यावर गुणेगारी होत नाहीं. परंतु जुलूम करून सातशे रुपये घेतले पैकीं सूट दिल्ही रुपये ३००, बाकी रुपये ४०० त्याजमुळे कागदी पलाले.

१ गिरासी परगणे मजकूर फार आहेत. याचे आमलात कांहीं बंदोबस्त नाहीं. पाटलास धरून नेऊन खंड घेतात. त्याची कांहीं दाद फिर्याद नाहीं. सिबंधी पुर्ती नाहीं, यामुळे स्वारी सिकारी नाहीं.

१ जमीन दिव्याची अकरासे बिघे वगैरे गांवची दीड हजार येकूण कमकसर आडीच हजार बिघे पाडली.

८

सदरहूप्रमाणें मामलेदार याचे वर्तणूक तेव्हां आमची नांदणूक कैसी होईल? आम्ही जमीदार जाले वर्तमान साहेबाचे सेवेसी विदित व्हावे म्हणून लिहिले आहे; परंतु याजकडेस मामलत राहिल्यानें परगणियाची वसाहत होणार नाहीं हे विज्ञापना. परगणियातील बेठ बिगार खातरेस येईल ते घेऊन जंबुसरास पाठविली. श्रुत होय व्हावे.

¶*The ryots and Jamidārs of Ankalesar complain to the Peshwa against the ravages perpetrated by Tulsi Shet to whom the Mamlat of the province was assigned. Several instances of the malpractices of the Mamlatdar are cited by the applicants.*

7792

No. 53] [22-11-1776

पौ छ सवाल
सुा सबा सबैन
कार्तिक मास

श्री

श्रीमोरया

पूर्वीचा संप्रदाय आपणांस विदितच आहे विशेष. येथील वर्तमान कार्तिक बहुल द्वादशी मंदवासरपर्यंत यथास्थित असें. स्वकीयानंद वर्तमान लेखन करून तोषवीत आसिलें पाहिजे. यानंतर टंकशाळेचें. काम दुलबशेट गोविंदजी याजकडोन दूर करून दामोदरशेट कोठारी व राजश्री भिकाजी जिवाजी यांजकडे सांगितलें; आणि फर्शी सिका मोहरा नाणें व रुपये चिंचवडीं पडत होते त्याप्रमाणें चिंचवडीं पाडोन श्रीकडे अन्नसत्रास हासिलाचा यैवज देत जावा ऐसा करार करून दिल्हा, त्या तागाईत आश्विन मासपर्यंत फर्शी नाणें व रुपये पुण्यातच पाडिले, श्रीकडे दाखला नाहीं. हासिलाचा ऐवजहि दिल्हा नाहीं. त्यांजकडे श्रीकडोन पत्रें जात गेलीं, त्याचें उत्तर येत गेलें कीं कारखाना घेऊन येतों; परंतु लिहिल्याप्रमाणें घडोन येईना. म्हणोन आश्विन मासीं आपणास पत्र पाठविलें. आपण ताकीद केली त्यावरून मागील हासिलाचा यैवज त्यानी आपले स्वधर्में ऐशी हजार रुपये पाडिले म्हणोन सांगून वारून दिल्हा; आणि आठा चौ दिवसां कारखाना घेऊन येतों तोंपर्यंत दाखल्यास मनुष्य ठेवावा ऐसा करार केला; त्यावरून मनुष्य ठेविले. त्यांस फर्शी शिका रुपये पाडितात त्याचा दाखला देतात. मोहरा पाडितात त्याचा दाखला श्रीकडे द्यावयाचा नाहीं, ऐसें म्हणोन मोहरा पाडितात, दाखला देत नाहींत. आलीकडे रुपये पाडिले त्याचा हासिल द्यावयास दिकत करितात. कारखाना चिंचवडास घेऊन येत नाहींत, याजकरितां राजश्री जिवाजी गोपाळ आपणांकडे पाठविले आहेत, सविस्तर निवेदन करतील. (ता)कीद होऊन दुलबशेट मोहरा पाडीत होते, त्या सिक्याच्या मोहरा हे पाडितात, त्याचा दाखला ध्यानास आणून हासिलाचा यैवज आजपर्यंत वारून देविला पाहिजे, आणि चिंचवडीं कारखाना घेऊन येऊन काम होत आले आहे, त्याप्रमाणें करीत तो अर्थ केला पाहिजे. या स्थळचें पूर्वीपासून आपण चालविलें आहे; पुढेंहि उत्तरोत्तर चालवणें आपणांसच आहे. विशेष काय लिहिणें.

¶*The Dev of Chinchvad reports the transfers of the management of a mint at Chinchvad from one Dulabh Shet to Damodar Shet and Bhikaji Jivaji, and requests the Peshwa to ask them to pay the mint tax due from them.*

7793

No. 54]

ऐतिहासिक व्यक्ती

SOME HISTORICAL PERSONAGES

¶The following list contains names of historical personages, whose origin and time are more or less obscure. Whatever information was obtained in the Peshwas' Daftar about them is here presented to the reader with a hope that it will lead to further investigation. The years in the bracket indicate the period when these names are referred to :—

अंताजी महादेऊ—दिा फरासखाना (इसन्ने सल्लासीन)

अंताजी माणकेश्वर—यास मुलगे दोन बहिरो अनंत व व्यासराव अनंत. व्यासरावाची मातुश्री आनुबाई.

अंबाजीपंत चिकोडकर—बाजी भीवराव याचे जावई (सीत आर्बैन)

अमृत शंकर— दिनकराव चिटणीस जिल्हेज (इसने अशरीन)

अहिल्याबाई—मातुश्री ताराबाईची नात (आर्बा आर्बैन)

आनंदराव तुबाजी—तुबाजी अनंत याचे पुत्र (तिस्सां आर्बैन)

आपाजी गणेश—याचे नातू, माधवराव अमृत मौजे लाखणगाव पोा नासिक (इसने मया तैन व आलफ)

आपाजी परभु—देशपांडे पाा श्रीवर्धन (छ ८ जिल्काद सलासीन)

आपाजीराम—पेशव्याच्या दरबारीं हैदराचा वकील. बापाचें नांव रामाजी नागेश. यास सन १७६७ त पेशव्यांकडून इनामगांव व कमावीस देण्याचा ठराव जाला होता.

आपाजी हरि—दिा कृष्णाजी भास्कर मलकापुरकर दिा संभाजीराजे (तिस्सां सल्लासीन)

आबाजी शंकर—शंकराजी गणेश नीलकंठराव याचे पुत्र शिलेदार (सीत आर्बैन)

आंवाजी कवडे—कमावीसदार सरदेशमुखी प्राा खानदेश (समान सलासीन)

इच्छारामपंत ढेरे—याचे नांव इच्छारामभट बिन शंकरभट गोत्र वासिष्ठ सूत्र आश्वलायन. मुलगे दोन रामचंद्र व हरि. याचे वंशज पुणें येथें विद्यमान आहेत.

कान्हो जनार्दन—सबनीस (आर्बा सल्लासीन)

कुवरबहाद्दर—फौजदार, सिन्नर (तिस्सा सल्लासीन)

काशीबाई—सौ.वती पिलाजी जाधवरावाची स्त्री (समान आर्बैन)

कृष्णाजी गोविंद—अस्कररराऊ शिलेदार निा महादाजी अंबाजी (सीत आर्बैन)
कृष्णाजी गोविंद—आपटे (सबा आर्बैन)
कृष्णाजी गोविंद—गोरे शिलेदार (आर्बा आर्बैन)
कृष्णाजी नारायण—शालग्राम, सलास अशरीन (मुलगा चिंतो कृष्ण ?)
केशरसिंग दलपतराऊ—बुंदेले याचा लेक (सल्लासीन)
केशवराव पाथरीकर—दिा निजामुलमुल्क (तिस्सा सल्लासीन)
खंडो गोमाजी—(पुरंदरे) दिा फतेसिंग भोसले (इसन्ने सल्लासीन)
गंगाधर बाजीराव—रेठरेकर, बाजी भीवरावाचा पुत्र
गणेश अनंत—थेरगावकर सिलेदार (सीत आर्बैन)
गणेश कासी—कात्रे रा . हेळगाव ता उंबरज यास पेशव्यांनीं प्रतिनिधीच्या कुलकारभारावर नेमिलें. हा सन १७९९ त मरण पावला. मुलगा बाबूराव गणेश दुसरे बाजीरावाचे मर्जीतला होता. पेशवाई गेल्यावर इंग्रज सरकारानें यास पांच हजार रु. सालीना सातारा छत्रपतीचे इलाख्यांत नेमून दिले. हा शके १७४२ च्या भाद्रपदमासीं वारला.
गद्रे यांची वंशावळ—सदाशिव रघुनाथ,—विष्णु सदाशिव उ. दादा, गणपतराव विष्णु.
गोपाळ जनार्दन तांबवेकर—यांचे पुत्र विश्वनाथ गोपाळ.
गोपाळजी गुंड—दुसरे बाजीरावाचा हस्तक.
गोपाळ धोंडो—पुरंदरे, शंकराजी मेघशाम याचा व्याही (छ ११ साबान सलासीन)
गोपाळ बल्लाळ—दिा कृष्णाजी भास्कर दिा संभाजीराजे तिस्सा सल्लासीन.
गोपालराव कृष्ण—खटावकर सिलेदार (तिस्सा सल्लासीन)
गोविंद बल्लाळ—आगाशे हरकारा (आर्बा सल्लासीन)
गोविंद बल्लाळ—गोखले (सीत आर्बैन)
गोविंद बल्लाळ—वैद्य (आर्बा आर्बैन)
गोविंद हरि—गोखले सिलेदार (सीत आर्बैन).
चंद्रभान मुधाजी—ठाकूर (आर्बा आर्बैन)
चापाजी टिळेकर—याचे बापाचें नांव संभाजी, जात फुलमाळी, राहणार ऐखतपूर ता. पुरंदर या गावी याचे वंशज विद्यमान आहेत. मुलगा हणमंत चापाजी व नातू हणमंतराव हा पेशवाईअखेर हयात होता.
चिंतामणराव नारायण—पाटणकर शिलेदार (तिस्सा आर्बैन)

चिंतो कृष्ण मजमदार—दिा तुळाजी सितोळे (तिस्सा सल्लासीन)
चिमणाजी खंडेराव—यशवंतराव होळकराचा हस्तक.
चिमणाजी भीमराव—फडणीस दिा सिवाजी दामोदर (सीत अशरीन)
जनार्दन बाबूराव—पाळंदे (आर्बा आर्बैन)
जिवाजी गणेश—लिमये सबनीस दिा बाळाजी बाजीराऊ (इसन्ने सलासीन)
तुबाजी अनंत—दिा रायाजी जाधव (छ ९ मोहरम सलास अशरीन)
त्रिंबक राजदेव—कमाविसदार पा सुरंज (तिस्सा सल्लासीन)
त्रिंबकराव कृष्ण—चित्राव (तिस्सा सल्लासीन)
दादंभट व त्रिंबकभट व माहादेवभट बिन भटंभट—इब्न महादेवभट पुरंदरे वास्तव्य कसबे पुणें (सब्रा अशरीन)
दादाजी माहादेऊ—खाडिलकर श्रीवर्धनकर (सीत अशरीन)
दुर्गाबाई—राणी सावंतवाडीकर (मृत्यु १७-१-१८१९)
देवाजी रेणुराव—रेणुराव यादव याचे पुत्र (आर्बा आर्बैन)
दौलतराम पुरोहित—निा सवाई जयसिंग (सीत सलासीन)
धोंडो कृष्ण—दिनकर महादेव याचे पुतणे (सीत आर्बैन)
धोंडो राम—पेशव्याचा वकील निजामाचे दरबारीं. याचा संबंध मौजे मादरणें ताा ओतूर या गांवाशीं येतो. धोंडो रामाचा नातू महिपत मल्हार स. १८२२ त हयात होता.
नरसो मोरेश्वर—वकील सोंधे येथें पेशव्यांकडून
नारायणराव आपाजी—परशुराम महादेव वकील याचे नातू (इहिदे सितैन मया व आलफ)
नारो खंडेराव—घोरपडे (समान सल्लासीन)
नारो तुकदेव—ह्यानें मोहरी पेटा जामखेड येथें "श्रीनारायणाश्रम स्वामी व चित्सुखाश्रमस्वामी" यांची समाधि स्थापून तिच्या खर्चाकरितां पेशव्यांकडून उत्पन्न मिळविलें. नारो तुकदेवाचा नातू मेघश्याम दिगंबर हा पेशवाई अखेर हयात होता. नारो दादाजी कमावीसदार कसबे सासवड (तिस्सा सल्लासीन)
नारो बावाजी—मराठा हरकारा (आर्बा आर्बैन)
नारो भगवंत सबनीस—यास जेजुरीचे तळ्याचे कामावरी ठेविले (सलास सलासीन)
नारो रामचंद्र—देवस्थळे यास दुसरे बाजीरावानें पालखीसाठीं गांव नेमून दिले. मुलगा भास्कर नारायण. याजला सातारा महाराजांकडून दरसाल रु. २४०० तनखा मिळत होता.

निंबाजी भास्कर—दुसरे बाजीरावाचा हस्तक—ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण, राहणार दिंडोरी.

निळो केशव—मजमदार दि॥ मल्हारजी होळकर (आर्बा सल्लासीन)

परशुराम बल्लाळ—मुतालिक सुरनीस दि॥ संभाजी राजे (आर्बा सल्लासीन)

पांडुरंग दादाजी—दि॥ राजश्री निळकंठराऊ प्रधान पन्हाला (सलासीन)

पोतनीस वडगावकर—नारो मोरदेव यास पुरंदऱ्यांनीं आपल्या पोतनिशीवर प्रथम नेमिलें. त्यासंबंधीं पुढील उल्लेख सांपडतो. "शामजी नारायण, व मोरोराम व बाजी माणकेश्वर व महिपतराव माहादेव, उपनाम आसलेकर गोत्र भारद्वाज सूत्र आश्वलायन, जोशी, कुळकर्णी मौजे लोहोम ता. नीरथडी प्रा॥ पुणे (छ २९ राखर सबा सबैन.")

बळवंतराव नागनाथ—हे नागोराम भागवत याचे पुत्र; दुसरा पुत्र लक्ष्मणराव नागनाथ.

पिंगळे पेशवे—पेशव्यांचा कुलगुरु वे. अच्युतभट बिन विश्वनाथभट कलमकर म्हणून होता. या गुरूचे गोत्र अत्रि सूत्र आश्वलायन, वास्तव्य श्रीत्रिंबकेश्वर. यास गोवर्धन प्रांतांत शाहू महाराजांनीं इनाम दिलेलें होतें. या पिंगळ्यांचें मूळ वास्तव्य वडगांव तालुके सिन्नर जिल्हा नासिक येथें असून, ते प्रथम शहाजीच्या नोकरींत होते, तेथून ते शिवाजीकडे आले. अच्युतभटाचा नातू नारायणभट आर्बा खमसैनांत (१७५४-५५) हयात असल्याचा दाखला मिळतो.

बापूजी गणेश—शेवडे (आर्बा सल्लासीन)

बाबूराव नारायण—केतकर (आर्बा आर्बैन)

बाळाजी कृष्ण—आठवले (आर्बा आर्बैन)

बाळाजी महादेव—गोगटे (आर्बा सल्लासीन)

बाळाजी महादेव—मांडवगणे कसबे मुखेड प्रा॥ पाटवदे येथील कुलकर्णी नानासाहेबाचे आरंभापासून कारभारांत होता. स. १७७३ त हा मरण पावला, आणि याचा सरंजाम मुलगा नरसिंगराव बल्लाळ याजकडे चालू झाला. स. १७७९ त नरसिंगराव गंगथडी प्रांताचा सरसुभेदार होता तो स. १७८६ त मरण पावला. पुढील माहिती उपलब्ध नाहीं.

बाजी मोरेश्वर—(समान तिसैन मया व अलफ) याचे कनिष्ठ बंधु रामचंद्र मोरेश्वर.

बावाजी भुजंग—दिा रा. संभाजीराजे (तिस्सा आर्बैन).

बाळाजी विसाजी—वकील रवाना बिदनूर (छ २१ जिल्हेज आर्बा सलासीन)

भगवंतराव तिमाजी—बापूजी भीमसेन याचा पुतण्या

भगवंत नाईक—पुरंदरे (तिस्सा सल्लासीन)

भवानीबाई—चिमणाजी दामोदर याची भावजय (छ ८ जिल्काद सला सीन)

भवानीशंकर—पाणिपतीं सरकारचाकरीवर गारद जाले. त्याचे कनिष्ठ पुत्र बावाजी भवानीशंकर प्रौढतेस येऊन सेवाचाकरीयोग्य जाले.

भावसिंग बुंदेले—दिा हिरदेसा (समान सल्लासीन)

भास्कर महादेव—(सुा आर्बा सबैन मया व आलफ) यांचे आजे दिनकर महादेव याजकडे ताा रत्नागिरि येथील व हशमाची फडनिसी.

भिवाजी तुकदेव—दिा उदाजी चव्हाण दिा निजामुल्मुल्क(छ १९ जिल्काद सीत सलासीन)

मखबुल आलम—जुन्नरकर मोगल (तिस्सा सल्लासीन)

मल्हारजी जाधव—दिा कुवरबहादर (इसने सलासीन)

मल्हार तुकदेव—पुरंदरे लग्न करून आले (इसने सलासीन)

मल्हार विश्वनाथ—बर्वे वाकनीस (आर्बा सल्लासीन)

महंमद इसफ—किल्लेदार परांडेकर (तिस्सा सल्लासीन)

महादाजी गणेश—महाजन, श्रीवर्धन (छ ७ रबिलाखर सलास अशरीन)

महादाजी नारायण—कुंटे (सीत आर्बैन)

महादाजी बल्लाळ—केतकर (सलास अशरीन)

महादाजी बल्लाळ—परभु मजमदार (आर्बा सल्लासीन)

महिपतराव भवानी—भवानी शिवराम यांचे पुत्र मौजे सिराळ पो नवासे (इहिदे मयातैन व आलफ)

यादवराव प्रल्हाद—वकील (समान सल्लासीन)

येसाजी कृष्ण—चिटणीस प्रभु दिा राणोजी भोसले (सीत अशरीन)

येसाजी मल्हार—कोरडे गोत्र अगस्ति, सूत्र आश्वलायन याचे घराणें बाई येथें मुजुमदार नांवानें नांदतें. शिवकालीन रघुनाथ बल्लाळ कोरडे याचाच वंशज येसाजी मल्हार. शाहू महाराजांनीं सुटून येतांच येसाजीच्या योगक्षेमाची तजवीज लावून दिली. मुलगा श्रीनिवास येसाजी व नातू दोन आनाजी रघुनाथ व बगाजी रघुनाथ.

रंगराव शिवदेव ओढेकर—हा स. १७५४ त कुंभेरीच्या वेढ्यांत मारला गेला, तेव्हां सरदारी त्याचा भाऊ त्रिंबक शिवदेव यास मिळाली.

रघुनाथ हरि—जोगळेकर हरकारा (तिस्सा सल्लासीन)

राघो आनंदराव—दिवाण सरलष्करांचे; याचें आडनांव घोत्रे. हा स. १७७३ त मरण पावल्यावर पुतण्या आनंदराव व्यंकटेश याकडे सरंजाम चालला. हा आनंदराव स. १७८३ त मरण पावला. त्यास मुलगे दोन रघुनाथराव व केशवराव. केशवरावाचा मुलगा यशवंतराव केशव पेशवाईनंतर हयात होता. कोणत्या सरलष्करांचे हे दिवाण त्याचा थांग लागत नाहीं. मौजे आल्वे वाहेगाव पा। बीड येथें या घराण्याची माहिती असावी.

राघो केशव—भागवत सभासद दि॥ शंकराजी केशव प्रां॥ वसई (आर्बा अर्बैन)

रघुनाथ गणेश—कोशे पेशव्याचा निजामकडे वकील (सीत आर्बैन).

राघो मल्हार दिवाणजी—मौजे कराडे ता. पनवेलचा कुळकर्णी. बाजीरावरघुनाथानें यास गांव सरंजाम दिला. तो आश्विन व ९ श. १७६९ रोजीं मरण पावला. मुलगा बापूजी रघुनाथ.

राजाराम गोविंद—उपनाम वाबळे गोत्र गार्ग्य सूत्र कात्यायन वस्ती कसबे अमदानगर राहणार कापुरवाडी, बंधु केसो गोविंद. (सु॥ आर्बा आर्बैन छ ९ जाखर.)

राणूबाई—सौ., रा॥ संभाजी जाधव याची बायको (इसन्ने सल्लासीन)

रामचंद्र खंडेराऊ—नि॥ रा. व्यंकटराव नारायण (२४ रबिलाखर समान सलासीन).

रामचंद्र मल्हार—सलास अशरीन दि॥ राणोजी सिंदे (इसने सलासीन)

रामजी सिंदे—कनेरखेडकर दि॥ साबाजी सिंदे दि॥ रंभाजी कदम (सीत अशरीन)

रामदासपंत—निजामाचा कारभारी. याचा भाऊ नरसिंगराव हाही कारभारांत होता.

रामाजी अनंत—भिडे (आर्बा आर्बैन)

रामाजी काशी—ठोसर (सीत आर्बैन)

रामाजी मल्हार—चिटणीस हा कोंकणांतील गृहस्थ पेशव्यांस मिळाला. त्याचा भाऊ गोविंद मल्हार-व पुतण्या धोंडो गोविंद दिल्लीस वकील होता.

रामाजी माणकेश्वर—दि॥ संताजी मोरे (आर्बा सल्लासीन)

रुद्राजी खंडेराऊ—दि॥ फतेसिंग भोसले (समान सल्लासीन)

रूपाजी सटवोजी—नाईक बेडका याची बहीण उदाजी पवाराची बाईल.

7799

रेणको अनाजी—याचें नांव उत्तरेकडील राजकारणांत येतें. हा नासिकचा. रहिवासी, गोत्र रौम्य, सूत्र याज्ञवल्की, उपनांव पारख. यानें स. १७५७ च्या सुमारास नासिक येथें रेणुकेचें देवालय बांधिलें. याचे वंशज नासिक अगर एकलहरें येथें असण्याचा संभव आहे.

लक्ष्मण आपाजी—निसिदे दिा शहाजी भोसले आर्बा सितैनपासून जामदारखान्याचे कामावर. आर्बा सबैनात मृत्यु पावल्याचा उल्लेख आहे. यास. पुत्र दोन. महिपतराव व यशवंतराव; महिपतरावाचा मुलगा चिमापा, चिमापाचा शंकरराव आणि शंकररावाचा चिमापा. आडनांव वैद्य उर्फ निसिदे जात प्रभु. चिमापा शंकर हा ता. १७ सप्टेंबर स. १८९९ तारखेच्या कैफीयतींत वरप्रमाणें माहिती देतो. वरील तारखेस त्याची उमर वर्षें ५२.

लक्ष्मण नरसिंह—काळे (सीत आर्बैन]

लाला प्रतापराऊ—दिा सवाई जयसिंग (समान सलासीन)

लाला भवानीदास—पारसनीस सां राजश्री स्वामी (सीत आर्बैन)

विठ्ठल कृष्ण—दिा कृष्णराव महादेव (तिस्सा सल्लासीन)

विठल बाबूराऊ—देशपांडिये पो सुपे (इसने सलासीन छ २८ सवाल)

विठ्ठल सुंदर—याचा भाऊ मोरोपंत म्हणून होता

विष्णुराम कमावीसदार—पा पाटोदे (आर्बा आर्बैन)

वेंकटराव कृष्ण—खटावकर (छ ९ रमजान सलासीन)

वेंकाजी सिवदेव—हेजीब अर्काटास सादुलाखानाकडे वस्त्रे घेऊन पाठविले (सवाल इसने सल्लासीन)

व्यंकटराव भगवंत—चंदावरकर (तिस्सा सल्लासीन)

व्यासराव चिंतामण—याचा बाप चिंतो कृष्ण हा आर्बा सितैनात राक्षसभुवनचे लढाईत कामास आला. याचें उपनाम दिवाकर, गोत्र गौतम सूत्र वाजसनी. त्याचा मुलगा विश्वासराव चिंतामण बापाचे नेमणुकीवर दाखल झाला त्याची हयात मयातैन आलफपर्यंत आढळते.

शामजी गोविंद—दिा बाबूराव मल्हार सिलेदार (समान सल्लासीन),

शामराज कानो—चिटणीस दिा सेनापति (समान सल्लासीन).

शामा नाइकीण—कलावंत चांभारगोंदेकर, (छ ११ रमजान इसने सलासीन)

शिवराम गोविंद—औरंगाबादकर (तिस्सां सल्लासीन)

7800

शिवराम गोविंद—भिडे (सबा आर्बैन)
शिवराव शंकर—सावनूरकर (तिस्सा सल्लासीन)
शिवाजी कुंजर—सलास अशरीन
श्यामजी महादेव—चिटणीस (सीत सलासीन)
श्यामजी गोविंद—उपनाम टकले हा प्रथम मल्हारराव बर्व्याचे मार्फत निजामाचे दरबारीं राहून पुढें पेशवे नानासाहेब व माधवराव यांचे वेळेस कारभारावर होता. याचा पुतण्या अमृतराव लक्ष्मण पेशवाईनंतर हयात होता.
श्रीधर पंडित—व त्याचा भाऊ देवदत्त उपनांव नेवासकर. हे दोघे कवि परमानंदाचे पुत्र.
संक्राजी दत्तात्रय—निजामुल्मुल्ककडे होता, (छ २० जिल्हेज आर्बा सलासीन)
संतूबाई सौ. वती महाडिक—(शाहूमहाराजांची मुलगी, खमस सबैन)
सदाशिव कान्हो—जमेनीस (आर्बा आर्बैन)
सदाशिव बल्लाळ वैद्य—(छ २० सफर आर्बा सलासीन)
सदाशिव मल्हार—बापूजी मल्हार व राघो मल्हार हे तिघे बंधु उपनांव बावळे देशस्थ ब्राह्मण महादजी सिंद्याचे नोकरींत वकिलीचे वगैरे कामावर होते.
सिद्भट ठकार—दिा मोहिते (आर्बा आर्बैन)
सिद्धेश्वर गणेश—कुंटे (समान आर्बैन)
सुभानराव सिंदे—दिा सेनाखासखेल (समान सल्लासीन)
हरबाजी कृष्ण रास्ते—(नानासा० पेशव्याचा काल).
हरि विश्वनाथ भावे—(सीत आर्बैन)
हिंमतराय—दिा हिरदेसा (समान सल्लासीन)

Index to Selection No. 45

Documents illustrating Maratha Administration.

[Figures refer to numbers of letters.]

C

D

E

F

G

H

I

J

J—contd.

K

L

M

M—contd.

N

N—contd.

P

R

R—contd.

S

MO-III Bk Ca 24—23

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.